७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. २७ जुलै २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : २१२ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# अंधभक्तांच्या विरोधात देशभक्त जिंकले

## मुंबईत ठाकरेंची जल्लोष सभा : उद्धव ठाकरे; राज ठाकरेंकडून आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांना आदरांजली




**मुंबई (दै. संध्या)**

विद्यार्थ्यांच्या आंदोलनासमोर केंद्र सरकारलाही झुकावे लागले आणि केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा लागला. याच पार्श्वभूमीवर मुंबईत ठाकरे बंधूंची जल्लोष सभा आयोजित करण्यात आली आहे. ही सभा मुंबईच्या सावरकर मार्गावर आयोजित करण्यात आली. शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्यासह दोन्ही पक्षातील नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने या जल्लोष सभेत उपस्थित होते. यावेळी राज ठाकरे यांनी आत्महत्या केलेल्या सर्व 21 विद्यार्थ्यांचे नाव घेत त्यांना आदरांजली वाहिली. तसेच उद्धव ठाकरे यांनी हा लढा देशभक्त विरुद्ध अंधभक्त असा होता आणि आपण तो जिंकला, असे विधान केले. सभेनंतर राष्ट्रगीताने सभेची सांगता करण्यात आली. त्यानंतर वंदे मातरम् हे गाणे लावले गेले. यावेळी सर्वांनी तिरंगा फडकवत गाण्याचा आस्वाद घेत विजयाचा जल्लोष साजरा केला.

दिल्लीत महिनाभरापासून कॉक्रोच जनता पार्टीसह देशभरातील लाखो विद्यार्थ्यांनी आंदोलन पुकारले होते. त्यात सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी देखील 20 दिवस उपोषण केले होते. त्यानंतर त्यांना पोलिसांनी बळाचा वापर करत उचलून नेले होते. या घटनेनंतर विद्यार्थी चांगलेच आक्रमक झाले व त्यांनी चलो संसद मोर्चा काढला, या मोर्चावर पोलिसांनी लाठी चार्ज केला होता. यानंतर देखील विद्यार्थ्यांनी कशालाही न जुमानता आपले आंदोलन सुरूच ठेवले. याचा परिणाम म्हणजे केंद्र सरकारला माघार घ्यावी लागली आणि धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला.

### ठाकरे बंधूंचं अस्तित्व संपलंय : राधाकृष्ण विखे पाटील

NEET पेपरफुटी प्रकरणानंतर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिलेल्या राजीनाम्याचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीमध्ये भव्य 'तिरंगा रॅली' पार पडली. या तिरंगा रॅलीला तरुणाईचा मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी सरकारवर टीका केली. त्यांच्या या टीकेला मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. जनतेने ठाकरे बंधूंच्याच झिंज्या उपटल्याचा टोला विखे पाटलांनी लगावला. मुंबईत आज ठाकरे बंधूंनी जल्लोष सभेचे आयोजन केले होते. यावेळी राज ठाकरे यांनी सरकारवर टीका केली. त्याला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. ठाकरे बंधूंचे अस्तित्व संपलेलं असून त्यांच्याच जनतेने झिंज्या उपटल्या असल्याचा जोरदार टोला विखे पाटलांनी लगावला. ते साताऱ्यातील कराडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना राज ठाकरे म्हणाले, "जो विजय आंदोलन अवघ्या देशभर पेटवलंत, त्या आंदोलनाला यश आलं. त्याचा उत्साह साजरा करण्यासाठी तुम्ही सर्वजण इथे हजर झाले आहात."

## चार दिवसांच्या संततधारेनंतर पुणेकरांना दिलासा

### शहरात पावसाची विश्रांती, घाटमाथ्यावर 'रेड अलर्ट'



**पुणे (दै. संध्या)**

गेल्या चार दिवसांपासून शहरात सुरू असलेल्या संततधार पावसानंतर शनिवारी (ता. २५) पुणेकरांना काहीसा दिलासा मिळाला. शहरातील बहुतांश भागांत पावसाने विश्रांती घेतली असून, काही ठिकाणी केवळ हलक्या सरी बरसल्या. दिवसभर ढगाळ वातावरण असूनही अधूनमधून ऊन पडल्याने वातावरणात बदल जाणवला. मात्र, शहरात उघडीप असली, तरी घाटमाथा परिसरात पावसाचा जोर कायम आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी पुण्यात कमाल तापमान २९ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २२.४ अंश सेल्सिअस इतके नोंदविण्यात आले. शहरात पावसाचा जोर ओसरला असला, तरी घाट विभागात काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच, तुरळक ठिकाणी अतिवृष्टीची शक्यता असल्याने हवामानशास्त्र विभागाने या परिसरासाठी 'रेड अलर्ट' जारी केला आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## आई आणि मुलीने रेल्वेखाली झोकून देत जीवन संपवलं

### सोलापूर जिल्ह्यात धक्कादायक घटना




**सोलापूर (दै. संध्या)**

सोलापूर जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. आई आणि मुलीने रेल्वेखाली झोकून देत जीवन संपवल्याची घटना घडली आहे. सोलापुरातील विजापूर रोड जवळील रेल्वे ट्रॅक जवळ ही घटना घडली आहे. 33 वर्षीय वर्षा आधटराव आणि 14 वर्षीय मुलगी स्वरा आधटराव यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. दरम्यान, या घटनेनं सोलापूर शहरात खळबळ उडाली आहे. दरम्यान, या आई आणि लेकीने आत्महत्या का केली? याचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. घटनेनंतर पोलिस घटनास्थळी दाखल झाले आहेत. पुढील तपास सुरु केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील विजापूर रोड जवळील रेल्वे ट्रॅक जवळ धक्कादायक घटना घडली आहे. आई आणि मुलीने रेल्वेखाली झोकून देत जीवन संपवलं आहे. घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आहे. पंचनामानंतर दोघींचे मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. मात्र या आई आणि लेकीने आत्महत्या का केली याचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. या घटनेचे तपास सोलापूर पोलीस करत आहेत.

# मीराबाई चानूची गोल्ड मेडलची हॅटट्रीक

## कॉमनवेल्थमध्ये रचला इतिहास : वेटलिफ्टिंगमध्ये १९० किलो उचलले; ऋषिकांतने पुरुषांमध्ये रौप्यपदक जिंकले

**मुंबई (दै. संध्या)**

भारताची वेटलिफ्टिंग स्पर्धक मीराबाई चानू हीने पुन्हा एकदा भारताची मान गौरवाने उंचावली आहे. कॉमनवेल्थ 2026 स्पर्धेत आपल्या कामगिरीने भारताचा नावलौकिक केला आहे. कॉमनवेल्थ गेम्स 2026 स्पर्धेच्या वुमन्स 48 वजनी गटात मीराबाई चानूने जबरदस्त कामगिरी केली. यासह तिने या स्पर्धेत भारताला पहिलं गोल्ड मेडल मिळवून दिलं. विशेष म्हणजे मीराबाई चानूचं हे या स्पर्धेच्या इतिहासातील सलग तिसरं गोल्ड मेडल आहे. या कामगिरीसह तिने या स्पर्धेत नवा इतिहास रचला आहे.




ग्लासगो कॉमनवेल्थ गेम्स 2026 स्पर्धेत मीराबाई चानूने महिलांच्या 48 किलो वजनी गटात एकूण 190 किलोग्रॅम वजन उचलून भारताला पहिलं गोल्ड मेडल मिळवून दिलं. यापूर्वी मीराबाईने 2018 मध्ये गोल्ड कोस्ट आणि 2022 मध्ये बर्मिंघम कॉमनवेल्थ स्पर्धेत भारताला गोल्ड मेडल मिळवून दिलं होतं. यावेळीही तिने या स्पर्धेत गोल्डन कामगिरी केली आणि भारताला पहिलं गोल्ड मिळवून देण्यात योगदान दिलं. मीराबाई चानूने यंदाच्या स्पर्धेत जिंकलेलं गोल्ड मेडल खास आहे. कारण तिने नव्या विक्रमासह या पदकाला गवसणी घातली आहे. तिने स्नॅच फेरीत 85 किलो वजन उचललं होतं. हा या स्पर्धेतील आणि कॉमनवेल्थमधील मोठा विक्रम आहे. यापूर्वी क्लीन अँड जर्कमध्ये 105 किलो वजन उचलून तिने गोल्ड मेडल पक्कं केलं होतं. मीराबाईने या स्पर्धेत एकूण 190 किलो वजन उचललं. स्नॅच फेरीची सुरूवात थोडी खराब झाली. पण त्यानंतर कमबॅक केलं आणि दुसऱ्या फटक्यात 82 किलो वजन उचलून स्वत:ला सावरलं. शेवटच्या फटक्यात 85 किलो वजन उचलून तिने कॉमनवेल्त स्पर्धेत एक विक्रम रचला आहे.

मीराबाई चानू हीने भारताला अनेक स्पर्धेत पदकं मिळवून दिली आहे. 13 वर्षांची असल्यापासून मीराबाई या स्पर्धेची तयारी करत आहे. आर्थिक स्थितीमुळे सुरूवातीला अडचणीचा सामना करावा लागला. डाएट फॉलो करणंही कठीण होतं. पण तिने त्यावर मात करून आता आपल्या कामगिरीचा ठसा उमटवला आहे. मीराबाई चानूने 2020 टोक्यो ऑलिम्पिक स्पर्धेत रौप्य पदक पटकावलं आहे. तर पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत चौथ्या स्थानावर समाधान मानावं लागलं होतं.

### विजेता कसा ठरवला जातो?

दोन्ही स्पर्धांमध्ये खेळाडूला प्रत्येकी तीन प्रयत्न मिळतात. स्नॅच आणि क्लीन अँड जर्कमध्ये यशस्वीपणे उचललेल्या सर्वाधिक वजनाची बेरीज करून एकूण वजन (टोटल) काढले जाते. सर्वाधिक एकूण वजन उचलणारा खेळाडू विजेता ठरतो. उदाहरणार्थ: जर एखाद्या खेळाडूने स्नॅचमध्ये 120kg आणि क्लीन अँड जर्कमध्ये 151kg वजन उचलले, तर त्याचे एकूण 271kg मानले जाईल. हेच त्याचे अधिकृत टोटल असते.

### ढिंग-टांग






# राज्यातील धरणांत ५६ टक्के पाणीसाठा

### महिनाभरात ४७८ टीएमसीची भर; विदर्भ, मराठवाड्यात चिंता कायम

**पुणे (दै. संध्या)**

जुलैमध्ये समाधानकारक पावसामुळे राज्यातील धरणांमधील उपयुक्त पाणीसाठा २२ वरून थेट ५६ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. मात्र, या वाढीचा लाभ राज्यातील सर्व भागांना समान मिळालेला नाही. पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील धरणे भरत असताना मराठवाडा आणि विदर्भातील अनेक महत्त्वाच्या धरणांमध्ये अद्यापही अत्यल्प किंवा शून्य पाणीसाठा असल्याने जलव्यवस्थापनाचे आव्हान कायम आहे. राज्यातील धरणांमधील उपयुक्त पाणीसाठा ८०३ टीएमसी (५६ टक्के) आहे. जूनअखेर राज्यातील धरणांमध्ये केवळ ३२४.५४ टीएमसी (२२ टक्के) उपयुक्त पाणीसाठा होता. त्यानंतर जुलैच्या पहिल्या ते तिसऱ्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे महिनाभरात ४७८ टीएमसीपेक्षा अधिक पाणी उपलब्ध झाले. मात्र, सर्व भागांमध्ये पावसाचे प्रमाण समान नसल्याने जलस्थितीमध्ये तफावत आहे. छत्रपती संभाजीनगर विभागाची स्थिती चिंताजनक आहे. यातील धरणांमध्ये २८ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. राज्यातील प्रमुख धरणांपैकी कोयना (६८ टक्के), उजनी (६८ टक्के), भातसा (८७ टक्के), मुळशी (९५ टक्के), डिंभे (८५ टक्के), भंडारदरा (९० टक्के) आणि कन्हेर (९४ टक्के) या धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा आहे. त्याउलट जायकवाडी धरणात केवळ ३९ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. राज्यातील काही प्रकल्पांची स्थिती अधिक गंभीर आहे. बुलडाणा जिल्ह्यातील खडकपूर्णा, हिंगोलीतील सिद्धेश्वर, तसेच धाराशिव जिल्ह्यातील सीना-कोळेगाव आणि बोरगाव धरणांमध्ये उपयुक्त पाणीसाठा शून्यावर आहे. याशिवाय बीडमधील माजलगाव (१३ टक्के), मांजरा (२५ टक्के), अकोल्यातील काटेपूर्णा (१७ टक्के), गोंदियातील सिरपूर (१८ टक्के) आणि परभणीतील दुधना (२३ टक्के) या प्रकल्पांमध्येही साठा अत्यल्प आहे.

# हाय-पावर टास्क फोर्सची स्थापना

## पेपरफुटी रोखण्यासाठी आता 'आधार' कार्डचे जनक मैदानात, पंतप्रधान मोदींची मोठी घोषणा

**नवी दिल्ली (दै. संध्या)**

नीट पेपरफुटी प्रकरणानंतर आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आणि परीक्षा व्यवस्थेतील सुधारणांसाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. इन्फोसिसचे सह-संस्थापक आणि नामांकित तंत्रज्ञान तज्ज्ञ नंदन नीलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय 'हाय-पावर टास्क फोर्स' स्थापन करण्यात येत असल्याची मोठी घोषणा पंतप्रधान मोदी यांनी केली आहे. परीक्षा पद्धत अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवणे हा या टास्क फोर्सचा मुख्य उद्देश असेल.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इन्स्टाग्राम आणि इतर सोशल मीडियावर व्हिडीओ संदेश शेअर करत देशातील तरुणांना आणि पालकांना आश्वस्त केले. ते म्हणाले, "भारत सरकार विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने ठोस निर्णय घेत आहे. ज्या लोकांनी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ केला आहे, ते आज तुरुंगात सडत आहेत. अशा प्रकरणांच्या जलद सुनावणीसाठी आपण आधीच फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन केले आहेत. याशिवाय संसदेत कडक कायदेशीर तरतुदींसह नवीन कायदा बनवण्याच्या दिशेनेही वेगाने काम सुरू आहे." भविष्यातील परीक्षा प्रणालीबद्दल बोलताना पंतप्रधान म्हणाले की, आता आपल्याला केवळ कारवाईवर न थांबता भविष्याचा विचार करावा लागेल. आपली परीक्षा पद्धत पूर्णपणे पारदर्शक आणि तंत्रज्ञानावर आधारित असणे अत्यंत गरजेचे आहे. याच पार्श्वभूमीवर नंदन नीलेकणी यांच्या नेतृत्वाखालील ही टास्क फोर्स संपूर्ण परीक्षा यंत्रणेचा अभ्यास करेल आणि त्यात आवश्यक सुधारणा सुचवेल. या टास्क फोर्सच्या अहवालाच्या आधारे आगामी सर्व परीक्षा पूर्णपणे पारदर्शक आणि लीक-प्रूफ पद्धतीने घेतल्या जातील.

नंदन नीलेकणी हे देशातील अग्रगण्य तंत्रज्ञान कंपनी 'इन्फोसिस'चे सह-संस्थापक आहेत आणि त्यांनी 'आधार' या भारतातील सर्वात मोठ्या डिजिटल ओळख प्रकल्पाचे यशस्वी नेतृत्व केले आहे. सार्वजनिक परीक्षांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पेपरफुटीच्या घटना कायमच्या रोखण्यासाठी आणि परीक्षा प्रक्रिया डिजिटल आणि पारदर्शक बनवण्यासाठी त्यांच्या नेतृत्वाखालील ही टास्क फोर्स महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

# संपादकीय

## सत्ताबदलाची आशा, की नव्या निराशा?

नेपाळमध्ये सध्याचे आंदोलन हे एका सरकारच्या विरोधापुरते मर्यादित नाही, तर लोकांच्या अपेक्षा आणि शासनाच्या कामगिरीतील वाढलेल्या अंतराचे प्रतीक आहे. परिवर्तनाचे स्वप्न पाहणाऱ्यांनाच आज पुन्हा रस्त्यावर उतरावे लागत असेल, तर ती कोणत्याही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. नेपाळने ही परिस्थिती सुधारण्याची संधी न मानल्यास अस्थिरतेचे चक्र पुन्हा सुरू होण्याचा धोका कायम राहील.

नेपाळचा राजकीय इतिहास हा नेहमीच अस्थिरतेच्या आणि अचानक येणाऱ्या परिवर्तनांच्या लाटांनी वेढलेला राहिला आहे. राजेशाहीचा अंत, माओवादी बंडखोरी आणि त्यानंतर लोकशाहीचा स्वीकार अशा अनेक वळणांवरून गेलेला हा देश सध्या पुन्हा एकदा एका मोठ्या अंतर्गत संघर्षाच्या आणि तीव्र असंतोषाच्या उंबरठ्यावर उभा आहे. मार्च २०२६ च्या निवडणुकांमध्ये ज्या 'जनरेशन झेड' म्हणजेच तरुण पिढीने एका मोठ्या क्रांतीची अपेक्षा ठेवून रॅपर आणि काठमांडूचे माजी महापौर बालेंद्र शाह यांच्या हाती देशाची सूत्रे सोपवली होती, तीच तरुण पिढी आज त्यांच्याविरोधात रस्त्यावर उतरली आहे. ज्यांनी सत्तेच्या शिखरावर बसवले, त्यांनीच अवघ्या काही महिन्यांमध्ये विरोधाचा झेंडा हाती घेतल्यामुळे नेपाळमधील हा संघर्ष केवळ राजकीय उरलेला नाही, तर एका सामाजिक आणि आर्थिक असंतोषाचा ज्वालामुखी बनला आहे. या ताज्या आंदोलनांची ठिणगी काठमांडूच्या रस्त्यांवर पडली. एका राईड-शेअरिंग ड्रायव्हरने (गणेश नेपाळी) म्युनिसिपल पोलिसांसोबत झालेल्या वादामधून आणि प्रशासकीय जाचाला कंटाळून केलेल्या आत्मदहनानंतर तरुणांच्या संतापाचा उद्रेक झाला; परंतु हे केवळ एका घटनेचे तात्कालिक पर्यवसान नाही. या आंदोलनामागे खोलवर रुजलेली कारणे आहेत. शाह यांच्या सरकारने शहराच्या सुशोभीकरणाच्या आणि शिस्तीच्या नावाखाली हजारो गरीब आणि भूमिहीन झोपडीधारकांना पुनर्वसनाशिवाय बेघर केले. गरिबांना थेट रस्त्यावर आणणाऱ्या या मोहिमांमुळे प्रशासकीय क्रूरतेचा चेहरा समोर आला आणि नेपाळमध्ये नव्याने आंदोलन पेटले. आर्थिक संकट, बेरोजगारी आणि वाढत्या महागाईमुळे आधीच होरपळत असलेल्या नेपाळी तरुणांना नवीन सरकारकडून रोजगाराच्या संधी आणि सहानुभूतीची अपेक्षा होती; परंतु त्याऐवजी त्यांना दंडात्मक कारवाया, प्रशासकीय हुकूमशाही आणि गरिबांना टार्गेट करणारी धोरणे पाहायला मिळाली. शाह यांच्या विरोधातील या तीव्र नाराजीचे विश्लेषण करताना त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. शाह हे पारंपरिक नेपाळी राजकारणाला कंटाळलेल्या मतदारांसाठी बदलाचा एक मोठा चेहरा म्हणून पुढे आले होते. त्यांचा आक्रमक आणि स्पष्टवक्ता स्वभाव तरुणांना आकर्षित करत होता; मात्र सत्तेवर आल्यानंतर हाच आक्रमक स्वभाव एकाधिकारशाही आणि असंवेदनशीलतेमध्ये बदलल्याचा आरोप आता होत आहे. विरोधकांचे म्हणणे ऐकून न घेणे, 'सोशल मीडिया' आणि माध्यमांवर अघोषित बंधने आणण्याचा प्रयत्न करणे आणि जमिनीवरील गरिबांच्या वास्तववादी समस्यांकडे पूर्णपणे डोळेझाक करणे, यामुळे त्यांची लोकप्रियता कमालीची घसरली आहे. ज्या लोकशाही आणि मानवी हक्कांच्या नावावर त्यांनी तरुणांची मते मिळवली, त्याच हक्कांची पायमल्ली नव्या राजवटीत होत असल्याचा सूर उमटत असल्यामुळे शाह सध्या कमालीचे बचावात्मक भूमिकेत आले आहेत. नेपाळमधील या अंतर्गत राजकीय आणि सामाजिक अस्थिरतेचे पडसाद केवळ त्यांच्या सीमांपुरते मर्यादित राहू शकत नाहीत, कारण नेपाळचे भारताशी असलेले संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आणि भौगोलिकदृष्ट्या संवेदनशील आहेत. दोन्ही देशांमध्ये असलेली खुली सीमा ही एका बाजूने दोन्ही संस्कृतींना जोडणारा दुवा असली, तरी नेपाळमधील अस्थिरतेच्या काळात ती भारताच्या अंतर्गत सुरक्षेसाठी मोठी चिंतेची बाब ठरते. नेपाळमध्ये अंतर्गत संघर्ष वाढल्यास किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास सीमेपलीकडून होणारी गुन्हेगारी, अमली पदार्थांची तस्करी आणि भारतविरोधी घटकांची घुसखोरी वाढण्याचा थेट धोका निर्माण होतो. नेपाळमध्ये जेव्हा जेव्हा अंतर्गत असंतोष किंवा राजकीय पोकळी निर्माण होते, तेव्हा चीनसारख्या परकीय शक्तींना तिथे आपला प्रभाव वाढवण्याची मोठी संधी मिळते.

## संस्कृत सुभाषित

बुभुक्षितैव्यकिरणं न भुज्यते । पिपासितैः काव्यरसो न पीयते ।
न च्छन्दसा केनचिदुद्धृत कुलं । हिरण्यमेवार्जय, निष्कला गुणाः ।

अर्थ : ज्याला कडकडून भूक लागलेली आहे, त्याला व्याकरणाच्या भोजनाचा उपयोग नसतो, जो तहानलेला आहे, त्याची तहान काव्यरसाने भागत नाही (भुकेला भोजनच लागते व तहानेला पाणीच लागते), तसेच वेदांचा अभ्यास करून कुळाचा उद्धार होत नाही तर संपत्तीशिवाय (सोन्याशिवाय) सारे गुण हे निष्फळ ठरतात.

## गुरु वचन

### दुसऱ्यांचे उपकार विसरू नका

इसापनीतीतील एक छान गोष्ट आहे. एकदा एका जंगलामध्ये एक लांडगा राहत होता. तो अत्यंत खादाड आणि दुष्ट होता. त्याला एकदा खूप जोऱ्याची भूक लागली, त्याने जंगलातले अनेक प्राणी मारून खाल्ले. पण इथेच तो अडकला. एका प्राण्याला मारल्यानंतर त्याला खाताना त्याच्या घशात त्या प्राण्याचे हाड अडकले.

त्याने ते हाड काढायचा खूप प्रयत्न केला, परंतु त्याला यश मिळाले नाही. त्याच्या त्या प्रयत्नांनंतर त्याला खूप त्रास सुरू झाला. त्याला नेमके काय करावे हेच समजत नव्हते. त्याने सुरुवातीला भुरपुर पाणी पिले, परंतु त्याला यश मिळाले नाही. मग त्याने आपल्या इतर मित्रांना आपल्या घशातले हाड काढण्यास सांगितले. परंतु त्याच्या साऱ्या मित्रांनी त्याच्याकडे पाठ फिरवली.

शेवटी त्याला त्याच्या डोक्यावरून एक बगळा उडत जाताना दिसला. त्याने त्या बगळ्याला आपली व्यथा सांगितली. तो म्हणाला बगळ्या तू तुझ्या त्या लांब चोचीने जर माझ्या घशात अडकलेले हे हाड काढलेस तर मी तुला बक्षीस देईन, तुझे ते उपकार मी कधीही विसरणार नाही.

बगळ्याला त्याची दया आली. त्याने लांडग्याला मदत करण्याचे ठरवले. तो त्या लांडग्या जवळ आला आणि त्याने त्या लांडग्याच्या घशात आपली चोच घालून आपल्या चोचीने ते अडकलेले हाड काढले. यानंतर त्या बगळ्याने त्याला आपले बक्षीस मागितले, परंतु त्या धूर्त लांडग्याने त्या बगळ्याला चकमा देत तो तेथून फरार झाला.

यानंतर काही दिवसांनंतर पुन्हा एकदा त्या लांडग्याच्या घशात हाडाचा एक तुकडा अडकला, त्याला पुन्हा बगळा दिसला, परंतु बगळ्याने यावेळेस त्याला मुळीच मदत केली नाही कारण यापूर्वी त्याच्यावर केलेल्या उपकारांना तो लांडगा विसरला होता. म्हणून लक्षात ठेवा कधीही दुसऱ्यांनी केलेल्या उपकारांना विसरू नका.

## उपदेशकथा

### कष्टाचे महत्त्व

एका नगरीत एक धनिक राहात होता. त्याला पाच मुले होती. त्या सर्वांची त्याने लग्ने केली. पहिल्या चारही भावांच्या बायका घरकामात आळशी होत्या. कामावरून त्यांच्यात भांडणे होत असत. पाचवी सून गरीब घरातील व सुशिक्षित होती. तिने आल्याबरोबर पाहिले की, घरकाम करायला कोणीही पुढे येत नाही. ती रोज पहाटे उठून सर्व घरकाम करू लागली. स्वादिष्ट भोजन बनवून सर्वांना जेवायला वाढून मग स्वत: जेवू लागली. त्यामुळे सासू तिच्यावर खुश झाली. सासू तिला म्हणाली, 'तुला एकटीलाच सर्व काम करावे लागते म्हणून तुला राग येत नाही का? तेव्हा ती म्हणाली, 'सासूबाई कामाने काही कोणी मरत नाही. उलट चांगला व्यायाम होतो व शरीर निरोगी राहते. स्वत:च्याच घरचे काम करण्यात लाज कसली? हे सर्व जावांनी ऐकले व लज्जेने त्यांची मान खाली गेली. तेव्हा त्यांना समजले की घरचे काम सगळ्यांनी मिळून केले तर घरात आणखीनच आनंद निर्माण होईल.

कथा उपदेश : स्वत:च्या उदाहरणाने आदर्श निर्माण करता येतो.

## पंचांग

| पंचांग | योग:वैधृति २२:५४:०९ |
|---|---|
| २७जुलै २०२६ | करण:तैतिल १६:१५:१० |
| सोमवार | करण:गर २९:१९:०९+ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:कर्क |
| आषाढ शके | चन्द्र:धनु |
| संवत्– १९४८ | हिजरी सन् – १४४८ |
| संवत्सर – पराभवनाम | मुस्लिम मास – सफर |
| अयन– दक्षिणायन | तारीख – १२ |
| मास– आषाढ | विशेष |
| ऋतु– सौर वर्षा | महाराष्ट्रीय बेंदूर |
| शुक्ल पक्ष | कल्याणसस्वामी पुण्यतिथी |
| तिथि:त्रयोदशी १६:१५:१० | – डोमगाव (परांडा) |
| नक्षत्र:मूल १०:२८:१४ | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०२२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 3 | 7 | | 6 | 4 | | 5 |
| 4 | | | | 1 | | | | 7 |
| | | | | | 3 | 2 | 6 | |
| 6 | | 1 | | 3 | | 5 | | 9 |
| | 7 | | | | | | 2 | |
| 2 | | 9 | | 7 | | 8 | | 6 |
| | 4 | 6 | 8 | | | | | |
| 8 | | | | 9 | | | | 4 |
| 3 | | 7 | 2 | | 4 | 9 | | |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०२१ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 2 | 6 | 9 | 3 | 7 | 8 | 5 | 1 |
| 5 | 8 | 9 | 4 | 1 | 6 | 2 | 7 | 3 |
| 7 | 3 | 1 | 5 | 2 | 8 | 9 | 6 | 4 |
| 3 | 6 | 5 | 7 | 8 | 4 | 1 | 2 | 9 |
| 1 | 9 | 7 | 2 | 6 | 3 | 5 | 4 | 8 |
| 8 | 4 | 2 | 1 | 5 | 9 | 6 | 3 | 7 |
| 2 | 7 | 8 | 3 | 9 | 5 | 4 | 1 | 6 |
| 9 | 5 | 4 | 6 | 7 | 1 | 3 | 8 | 2 |
| 6 | 1 | 3 | 8 | 4 | 2 | 7 | 9 | 5 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५४९ – जेसुइट धर्मगुरू फ्रांसिस झेवियरचे जपानमध्ये आगमन.
- १६६३ – ब्रिटीश संसदेने कायदा केला ज्यानुसार अमेरिकेत जाणारा सगळा माल इंग्लंडच्याच जहाजातून ईंग्लिश बंदरातूनच पाठवणे बंधनकारक ठरले.
- १६९४ – बँक ऑफ इंग्लंडची रचना.
- १७७८ – अमेरिकन क्रांती–उशांतची पहिली लढाई – ईंग्लंड व फ्रांसच्या आरमारे तुल्यबळ.
- १७९४ – फ्रेंच क्रांती – १७,००पेक्षा अधिक क्रांतीशत्रूंच्या निधन दंडाच्या शिक्षेत हात असलेल्या मॅक्सिमिलियें रॉबिस्पियरेला अटक.

### राष्ट्रीय

- १९७९ – जनता पक्षाच्या संसदीय नेतेपदाचा मोरारजी देसाई यांचा राजीनामा. जगजीवन राम यांची त्याजागी निवड.
- २००३ – घाटकोपर रेल्वे स्थानकावर बॉम्बस्फोट, पाच जण ठार.

### जन्म

- १६६७– योहान बर्नोली, स्विस गणितज्ञ.
- १८८२– जॉफ्रे डी हॅविललँड, ब्रिटीश विमान अभियंता.
- १९५५– ॲलन बॉर्डर, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १९६३– नवेद अंजुम, पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू.
- १९६९– जाँटी ऱ्होड्स, दक्षिण आफ्रिकी क्रिकेट खेळाडू.

### निधन

- ११०१ – कॉन्राड, जर्मनीचा राजा.
- १२७६ – जेम्स पहिला, अरागॉनचा राजा.
- १५६४ – फर्डिनांड पहिला, पवित्र रोमन स्म्राट.
- १९८० – मोहम्मद रझा पहलवी, इराणचा शहा.

## : SMS :

Teacher: Chintu, batao 2+2 kitna hota hai?

Chintu: Ma'am, jitne aap number doge

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.१ | २४.५ |
| अहमदनगर | ३१.७ | २२.४ |
| अकोला | ३७.६ | २५.४ |
| अमरावती | ३६ | २४.९ |
| बीड | ३९.१ | २५ |
| भंडारा | ३७.४ | २५.६ |
| बुलढाणा | ४२.५ | २९.६ |
| चंद्रपूर | ३९.१ | २५.५ |
| चेन्नई | ३९.७ | ३१.४ |
| नवी दिल्ली | ४१.४ | ३४.४ |
| धुळे | ३६.१ | २५.१ |
| गोंदिया | ३५.९ | २५.२ |
| जळगाव | ३६.३ | २५.२ |
| कोल्हापूर | २७.३ | २२ |
| लातूर | ३३.१ | २२.७ |
| मुंबई | ३३.९ | ३१.६ |
| नागपूर | ३६.८ | २४.५ |
| नांदेड | ३७.१ | २५ |
| नंदूरबार | ३०.४ | २५ |
| नाशिक | २९.४ | २२.७ |
| पुणे | २५.३ | २२.४ |
| पंढरपूर | ३५.६ | २४.३ |
| सातारा | ३० | २१.१ |
| सांगली | ३२.४ | २२.४ |
| सोलापूर | ३५.५ | २३.७ |
| वर्धा | ३८.२ | २५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर आपली महत्वकांक्षा आज आपल्याला सफलता मिळवून देणार आहे.

**वृषभ :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पुर्व गृहपयोगी वस्तू खरेदी कराल. व्यापारात विस्तारासाठी जास्त प्रयत्न करावे लागतील.

**मिथुन :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर विचार पूर्वक काम हाती घ्या. कामाच्या ठिकाणी महत्व मिळून त्याचा प्रभाव वाढेल.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पुर्व खर्चामध्ये वाढ होईल त्यामुळे चिंता वाढेल. आखलेल्या योजनेत आडथळा येईल.

**सिंह :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारामध्ये महत्वाचे सौदे होतील. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका.

**कन्या :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पुर्व कामामध्ये मनासारखे परिणाम दिसून येतील. आपल्या बुद्धी चातुर्याचे अधिकारी प्रशंसा करतील.

**तुळ :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:दक्षिण आपली कामे वेळेतच पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. आरोग्याची चिंता राहील.

**वृश्चिक :** शुभ रंग: गुलाबी,शुभ दिशा:पुर्व पराक्रमात वाढ होईल. काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. निष्कारण कोणत्याही वादात गुंतु नका.


**धनु :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:उत्तर सामाजिक कार्यक्रमात सक्रीय रहाल. आनंदाचे वातावरण राहील. व्यापारात नवीन फायदेशीर प्रस्ताव मिळतील.

**मकर :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : दक्षिण अचानक लाभ होण्याचे योग. प्रिय व्यक्ती भेटल्याने आनंदी रहाल.

**कुंभ :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पुर्व कौटुंबिक सहकार्य लाभेल त्यामुळे कामात उत्साह राहील.केलेल्या प्रयत्नांना यश मिळेल. शत्रुपासून सावध रहा.

**मीन :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर बुद्धीच्या जोरावर आपली समस्या दूर होऊ शकते. व्यापारात यश मिळण्याचे योग आहेत. कौटुंबिक समृध्दीत वाढ.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०२२



**आडवे शब्द**

१. जेवण करण्याची योग्य गती
३. खबदाड
६. भालचंद्र नेमाडे यांची ओळख
१०. जीव भांड्यात पडणे!
११. पातक
१२. गोल गोल, भरा भरा
१५. आपोआप
१६. दड, दडून रहा
१८. टक, दृष्टी
२०. कलेचे दैवत
२१. धडक
२२. मऊ तलम कापड प्रकार
२५. पूर्ण साठ मिनिटे
२८. चेहऱ्याला आकार देणारी हाडे
२९. मोठे चर्मवाद्य
३०. अवयवांसह
३२. मुंबईतील प्रसिद्ध वृद्धाश्रम
३३. हिंदीत वेळ
३४. हालचालीवरील नजर
३५. कोल्हापूरची महालक्ष्मी
३७. थेट, सरळ
३९. देवाशी देवघेवीचा करार
४१. पालक, पित्यावरून श्रीकृष्णाचे एक नाव
४४. पाणी
४६. किंचीत वक्रता
४७. छोटा, बारीक
४९. कलावंत
५१. लज्जास्पद
५३. मनोहरी दृश्य
५४. रात्र
५६. लोणी
६०. काळी मैना
६२. संरक्षक भिंत
६३. सहाचा समूह
६५. अफवा
६७. छोटा खड्डा
६८. वाळवंट
६९. इंधन, जळाऊ लाकूड
७०. सामान
७१. ज्याप्रमाणे
७३. उन्हाळ्यातील खास मिष्टान्न
७६. '–– नयनांचे दल हलले गं'
७७. नुसतेच नाव मोठे
७८. अखेरीस

**उभे शब्द**

१. पत्रातील सा.ना.वि.वि.
२. रोमांच
३. नकोसे, काहीतरीच
४. बासरी
५. पदार्थ शिजतानाचा आवाज
७. संदर्भांच्या स्पष्टीकरणासह
८. कष्टाळू, कणखर
९. भेदाभेद
११. संगोपनकर्ता
१३. गवंडी
१४. उष्ण
१५. आजपर्यंत
१६. सोपे
१९. नाजूक
२३. आवर घालणारी दोरी
२४. लफडी करणारा
२६. सरळ मोठा वासा
२७. रसवान
२९. वाकणे, पडते घेणे
३१. जमीनदार
३३. सखी, मैत्रीण
३४. स्वयंपाकाचे शास्त्र
३६. लहान मूल
३८. झाकण असलेले पात्र
४०. नटणे
४२. गर्द लाल रंग
४३. छोटी
४५. असंमती, अस्वीकार
४८. नेत्रकटाक्ष
५०. धोबी
५२. सवाद्य
५५. कमळ
५७. उणे
५८. बेचव, रुचीहीन
५९. बिनवासाचे पांढरे फूल
६१. नोंद
६४. रायगडावरील एक कडा
६६. संत्रे, मोसंबीच्या वर्गातील मोठे फळ
६८. जिव्हा
७२. दास
७४. भलतीच पंचाईत
७५. 'ती येते आणि ––, येताना कधी कळ्या आणते अन् जाताना फुले मागते'

**जम्बो शब्दकोडे क्र. १०२१ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.मानवता ४.संगमरवर ८.एडका १०.सारखा १२.वाफ १५.कारखानदार १८.हारजीत १९.धबधबा २०.सनद २१.पार २३.मर २४.लाजरा २६.होकायंत्र २७.नकारघंटा ३०.रवाळ ३१.वसंत ३२.कसदार ३४.निळवा ३६.मगर ३८.धड ३९.मास्तर ४०.देखावा ४१.चणे ४२.शरमिंदा ४३.उदक ४४.कैवार ४५.तक्र ४६.सैनिक ४७.नाक ४८.सकल ४९.तप ५०.अन्य ५१.तास ५३.गदा ५४.यजमान ५५.भरभराट ५७.सांज ५९.नवार ६२.गवत ६३.खोगीरभरती ६५.मजा ६७.पार्वती ६८.कालपरवा ६९.कसाबसा ७१.घोळ ७२.रीत

उभे उत्तर : १.माया २.वसा ३.तारकाबारका ५.गजानन ६.रकार ७.रत्नहार ८.एकजीव होणे ९.कावा ११.खार १३.फट १४.अंबर १६.खस १७.दादला १९.धमकावणी २१.परावार २२.सायंकाळ २५.जरदाळू २७.नतमस्तक २८.रफार २९.टाकणखार ३३.माड ३४.निवारक ३५.वायदा ३७.गर ३८.धणे ३९.मादक ४०.देवालय ४१.चक्र ४२.शनि ४३.उनाड ४४.कैक ४५.तपन ४६.सैन्यभरती ४८.सदा ४९.तमासगीर ५१.तारा ५२.सटवी ५३.गजगती ५६.भरमसाट ५८.भूतकाळ ५९.नभ ६०.वारकरी ६१.सपाता ६३.खोपट ६४.रवाना ६६.जाब ७०.साय

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



## युवकांनी संस्कारक्षम उपक्रमात सक्रीय व्हावे - खासदार मेधा कुलकर्णी

**पुणे : दैनिक संध्या**

आजची युवा पिढी इंटरनेटच्या ज्ञानावर वाढते आहे, ज्यात मूळ संस्कारांचा अभाव जाणवतो. युवकांनी नव्या तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करत संस्कारक्षम उपक्रमात सहभागी होत भारतीय संस्कृती आणि परंपरा समृद्ध करायला हवी, असे प्रतिपादन खासदार मेधा कुलकर्णी यांनी आज येथे केले. एम.आय.टी. विद्यापीठातील विवेकानंद सभागृहात आदित्य प्रतिष्ठान आयोजित सुन्दरकाण्ड ग्रंथ प्रकाशन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण, गुरुदेव शंकर अभ्यंकर, अपर्णा अभ्यंकर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी कुलकर्णी पुढे म्हणाल्या की, कुठेतरी आपली मूळ संस्कृती हरवत चालली आहे. इंटरनेटवर नको ते सगळे आहे. तरुण पिढीला संस्कारक्षम असे चांगले प्रबोधन होण्यासाठी विशेष प्रयत्न करायला हवेत. आपल्याकडे समृद्ध ज्ञानाची मोठी परंपरा आहे. देशकार्याला अध्यात्माची जोड द्यायला हवी. दुर्दैवाने आज विडंबन करणारी कीर्तने होत आहेत, जे बदलायला हवे. यावेळी शंकर अभ्यंकर म्हणाले की, वाल्मीकि रामायणावरील टीकाभाष्य असलेल्या शङ्कर रामायणातील आज प्रकाशित झालेले सुन्दरकाण्ड सुमारे ९ हजार पाचशे ओव्यांचे आहे. उरलेली दोन काण्डे (युद्धकाण्ड व उत्तरकाण्ड) देखील लवकरच प्रकाशित होणार आहेत. हा संपूर्ण ग्रंथसंच सुमारे ७५ हजार ओव्यांचा होईल, जो विश्वविक्रमी असेल. योगेश सोमण यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात शंकर अभ्यंकर व सहकाऱ्यांनी वारकरी कीर्तन सादर केले. आदित्य अभ्यंकर यांनी सूत्रसंचालन केले तर जितेंद्र अभ्यंकर यांनी आभार मानले.



## हरिनामाचा गजर करीत विद्यार्थ्यांनी केला पर्यावरणाचा आदर

**पुणे : दैनिक संध्या**

■ जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस तर्फे अनोखा पालखी सोहळा ; विविध गुणदर्शनातून उलगडली संतांची महती

प्लास्टिकला नकार, वारकऱ्यांचा निर्धार... कचरा टाका डब्यात, विठ्ठल राहील मनात... असे फलक पालखी सोहळ्यात हाती घेऊन हरिनामाचा गजर करीत विद्यार्थ्यांनी पर्यावरणाचा आदर केला. जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसच्या विद्यार्थ्यांनी मानाजीनगर नऱ्हे परिसरात पालखी सोहळा व विविध कार्यक्रमात सहभाग घेत जनजागृती देखील केली. नऱ्हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसच्या विविध विभागातील विद्यार्थ्यांनी पालखी सोहळ्यात उत्साहाने सहभाग घेतला. संस्थेच्या खजिनदार सुरेखा जाधवर यांच्या हस्ते पालखी पूजन व आरती करण्यात आली. तसेच संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संस्थेच्या सभागृहात यानिमित्ताने आयोजित केलेल्या विविध गुणदर्शन कार्यक्रमात नदी जोड प्रकल्प, झाडे लावा झाडे जगवा, पाणी आडवा पाणी जिरवा याविषयी देखील जागृती करण्यात आली. तसेच विविध संतांच्या कथा नृत्याद्वारे उपस्थितांसमोर उलगडण्यात आल्या. यावेळी विद्यार्थी पारंपरिक वेशात सहभागी झाले होते.

## हर्षदा अभिजीत फरांदे यांची भाजप महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी निवड

**पुणे : दैनिक संध्या**



भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी हर्षदा अभिजीत फरांदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांच्या नेतृत्वात काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानले. हर्षदा फरांदे म्हणाल्या, "पक्ष संघटनेने माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी मी पूर्ण क्षमतेने काम करेन. संघटनेला अधिक बळकटी देण्याची संधी मी निश्चितच आत्मसात करेन. महिला मोर्चाचे जाळे राज्यभर अधिक सक्षम करण्यासाठी आणि पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी वेळोवेळी प्रयत्नशील राहीन."महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माझ्यावर जाबबदारी सोपवून दाखवलेल्या विश्वासास निश्चित पात्र ठरू असा विश्वास हर्षदा फरांदे यांनी व्यक्त केला.

## एम्प्रेस गार्डनसमोरील 'प्रिन्स ऑफ वेल्स ड्राइव्ह' खड्ड्यांच्या विळख्यात

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे शहरातील कॅम्प परिसरातील एम्प्रेस गार्डनसमोरील 'प्रिन्स ऑफ वेल्स ड्राइव्ह' या महत्त्वाच्या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याच्या डांबरीकरण व विस्तारीकरणासाठी सहा कोटी रुपयांचे काम ठेकेदाराला दिले. मात्र त्यांनी आखाती देशातील युद्धामुळे डांबराचे दर वाढल्याचे कारण देत या रस्त्याचे काम केलेच नाही. परिणामी वाहनचालकांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. एम्प्रेस गार्डनपासून पुढे पुणे स्टेशन आणि कॅम्पकडे जाणारा हा मुख्य आणि वर्दळीचा मार्ग आहे. सुमारे अडीच ते तीन किलोमीटर लांबीचा हा रस्ता कॅम्प, वानवडी, घोरपडी, कोरेगाव पार्क आणि पुणे रेसकोर्स परिसराला जोडणारा प्रमुख दुवा आहे. दररोज हजारो दुचाकी, चारचाकी तसेच मालवाहू वाहने या मार्गाचा वापर करतात. एम्प्रेस गार्डन, राष्ट्रीय युद्धस्मारक, रेसकोर्स आणि संरक्षण दलाच्या विविध आस्थापनांकडे जाणाऱ्या नागरिकांसाठीही हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र या रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे.

# आयुर्वेदात निदानाचे महत्व सर्वाधिक

**आयुर्वेद वाचस्पती ज्येष्ठ नामांकित वैद्य त्रिलोक धोपेश्वरकर ; आयुर्वेदाचार्य वैद्य पराग दाते यांना यशस्वी युवा वैद्य पुरस्कार प्रदान**

■ पुणे (दै. संध्या)




रुग्णाला काय झाले आहे, याबद्दलचे अचूक निदान, युक्ती आणि चिकित्सा या तिन्ही गोष्टी जो नीट जोडू शकतो तो वैद्य यशस्वी होतो. आयुर्वेदात प्रश्न चिकित्सेने रुग्णांकडून अनेक गोष्टी समजू शकतात. ही अतिशय सोपी व प्राथमिक पद्धत आहे. प्रगतीशील वैद्य व्हायचे असेल, तर आयुर्वेदीय निदानाची कास धरायला हवी. तसेच आयुर्वेदीय ग्रंथ प्रमाण मानून वाटचाल करायला हवी, असे मत आयुर्वेद वाचस्पती ज्येष्ठ नामांकित वैद्य त्रिलोक धोपेश्वरकर यांनी व्यक्त केले.

वैद्य लावगनकर परिवारातर्फे आणि लिडजेन आयुर्वेदिक्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या वतीने कै. वैद्य चंद्रकांत उर्फ नाना लावगनकर स्मृतिप्रीत्यर्थ यशस्वी युवा वैद्य पुरस्कार सोहळ्याचे आयोजन पटवर्धन बागेतील धन्वंतरी सभागृहात करण्यात आले होते. यावेळी रत्नागिरीचे आयुर्वेदाचार्य वैद्य पराग दाते यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. व्यासपीठावर कार्यक्रमाचे आयोजक वैद्य लक्ष्मण लावगनकर, वैद्य माधव भागवत आदी उपस्थित होते.

पुरस्कार वितरण सोहळ्याचे यंदा सहावे वर्ष असून सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते. वैद्य त्रिलोक धोपेश्वरकर यांनी 'आयुर्वेदीय निदानाचे महत्व' या विषयावर यावेळी व्याख्यान दिले. वैद्य पराग दाते म्हणाले, आयुर्वेद शास्त्राच्या अभ्यासाकडे आपली प्रवृत्ती ठेवली आणि अनुभवातून शिकलो, तर शास्त्र दृष्टीसही वैदयांना चांगले यश मिळेल. प्रथमतः व्याधीचे निदान करता आले, तर पुस्तकात सर्व प्रकारच्या चिकित्सा दिल्या आहेत. त्यामुळे पुढील गोष्टी सोप्या होऊ शकतात. त्याकरिता सुरुवातीला निदान अचूक होणे आवश्यक आहे. वैद्य लक्ष्मण लावगनकर म्हणाले, आयुर्वेद जितका सोपा करता येईल, तितका समाजात खोलवर रुजविता येईल, अशी कै. वैद्य चंद्रकांत उर्फ नाना लावगनकर यांची धारणा होती. त्यांनी आयुर्वेदाच्या प्रचार आणि प्रसारासाठी आयुष्य झिजविले आणि वैद्य परंपरेत स्वतःचा ठसा उमटवला. स्वतः आयुर्वेदाची दिनचर्या पाळून उत्तमोत्तम वैद्य घडविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या विचारांचा नंदादीप तेवत ठेवण्यासाठी त्यांच्या पुढच्या पिढीने युवा वैद्य पुरस्काराचे आयोजन केले, असेही त्यांनी सांगितले. पद्मश्री कुलकर्णी जोशी यांनी सूत्रसंचालन केले. वैद्य राम भारसाखले यांनी आभार मानले.

## तीन दिवसांपासून पुलावरून पाणी; खरपूडी बुद्रुक-खुर्दचा संपर्क तुटला

■ पुणे (दै. संध्या)

चासकमान धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने भीमा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू आहे. त्यामुळे भीमा नदी दुथडी भरून वाहत असून, खेड तालुक्यातील खरपूडी बुद्रुक व खरपूडी खुर्द या गावांना जोडणाऱ्या भीमा नदीवरील पुलावरून सलग तीन दिवस पाणी वाहत आहे. परिणामी दोन्ही गावांतील संपर्क पूर्णपणे तुटला असून ग्रामस्थांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. यापूर्वी ८ जुलै रोजी आलेल्या पुरात खरपूडी येथील भीमा नदीवरील बंधाऱ्याजवळील रस्ता व शेतजमिनी वाहून गेल्याने त्या मार्गानेही ये-जा करणे बंद झाले आहे. त्यामुळे अवघ्या एक किलोमीटरच्या अंतरासाठी ग्रामस्थांना तब्बल १२ किलोमीटरचा वळसा घालून प्रवास करावा लागत आहे. या परिस्थितीचा फटका कंपनीतील कामगार, दूध व्यावसायिक, भाविक तसेच दैनंदिन प्रवाशांना बसत आहे. विशेषतः खरपूडी खुर्द येथील अनेक विद्यार्थी खरपूडी बुद्रुक येथील शाळेत शिक्षणासाठी येत असल्याने त्यांचे शाळेत जाणेही पूर्णपणे बंद झाले आहे. ग्रामस्थांच्या माहितीनुसार, हा पूल २०१८ मध्ये बांधण्यात आला. मात्र पुलाची उंची कमी असून त्याखाली बसविण्यात आलेल्या नळ्यांमध्ये दरवर्षी पूरकाळात कचरा अडकल्याने पाण्याचा प्रवाह अडतो आणि पुलावरून पाणी वाहू लागते. त्यामुळे दरवर्षी या पुलावरील वाहतूक खंडित होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

## खेडेकर हॉस्पिटल येथे मोफत दंत व नेत्र उपचार केंद्राचा शुभारंभ

**नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होणार**

■ पुणे (दै. संध्या)



पुणे महानगरपालिकेच्या वतीने कै. द्रोपदाबाई मुरलीधर खेडेकर हॉस्पिटल, बोपोडी येथे मोफत दंत व नेत्र तपासणी व उपचार केंद्राचे उद्घाटन आज उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या हस्ते पार पडले. या केंद्रामुळे पुणेकरांना त्यांच्या परिसरातच मोफत व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होणार असून, नागरिकांच्या आरोग्य संवर्धनासाठी हा महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या नव्या केंद्रामध्ये एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटल यांच्या सहकार्याने नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी व उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच डी. वाय. पाटील डेंटल कॉलेज यांच्या सहकार्याने मोफत दंत तपासणी व उपचार सेवा देखील सुरू करण्यात आली आहे. सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा सहज आणि मोफत उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. ही सुविधा नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावी यासाठी माजी उपमहापौर सुनीता परशुराम वाडेकर यांनी विशेष पुढाकार घेतल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान कै. बाबुराव शेवाळे दवाखान्यात लवकरच मोफत कॅन्सर केअर, डायग्नोस्टिक व सपोर्ट सेंटर सुरू करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच बोपोडी येथील संजय गांधी रुग्णालयात अत्याधुनिक आयसीयू (ICU) बेडची सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्याचा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

## "पाच फुटाचा बच्चन" मधून दुमदुमणार राम कृष्ण हरीचा गजर

■ एकपात्री नाटक ते सिनेमा : पाच फुटाच्या बच्चनचा दैदीप्यमान प्रवास

■ 'पाच फुटाचा बच्चन' चित्रपटात तरूण कीर्तनकार मुलीची गोष्ट उलगडणार

■ कौस्तुभ रमेश देशपांडे यांचं लेखन, दिग्दर्शन

■ पुणे (दै. संध्या)




नाटकाचं रुपांतर चित्रपटात होण्याच्या आजवरच्या यशस्वी परंपरेत आता आणखी एका सिनेमाचे नाव जोडले जाणार आहे. एकपात्री प्रायोगिक नाटक असलेली 'पाच फुटाचा बच्चन' ही गोष्ट आता चित्रपटातून मोठ्या पडद्यावर येत आहे. चित्रपटात तगडी स्टारकास्ट पाहायला मिळणार असून, लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पहिलेवहिले टीजर पोस्टर आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आले आहे .

कौस्तुभ रमेश देशपांडे यांनी चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन केलं आहे. राहुल कर्णिक आणि ऑर्फियस स्टुडिओज् यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. या चित्रपटात गौरी नलावडे, शशांक शेंडे, चिन्मयी सुमित, क्षितिश दाते, किशोर कदम, आशय कुलकर्णी, पुष्कराज चिरपुटकर, ओमप्रकाश शिंदे, समीर पाटील, विनोद वणवे यांच्या महत्वाच्या भूमिका आहेत. अभिषेक शेटे यांचं छायांकन, सौरभ प्रभुदेसाई यांचं संकलन, शंतनु-दिनेश यांचं ध्वनी आरेखन आहे. तसेच निरंजन पेडगावकर यांनी संगीत दिलेले असून प्रदीप आवटे यांनी गीतलेखन केलेले आहे. या सगळ्यात 'पाच फुटाचा बच्चन' नक्की कोण साकारणार, हे मात्र अजून गुलदस्त्यात ठेवण्यात आलं आहे.

आषाढी एकादशीच्या मुहूर्तावर प्रदर्शित झालेल्या या टीजर पोस्टरनंतर 'पाच फुटाचा बच्चन' या सिनेमाच्या आकर्षक चित्रशीर्षकाने सगळ्यांचे लक्ष वेधले आहे. या टीजर पोस्टरवरुन हा चित्रपट विठ्ठल भक्ती, वारकरी संप्रदाय, कीर्तन परंपरा याच्याशी निगडीत आहे असे दिसत आहे. एक तरुण कीर्तनकार मुलगी आणि तिच्याभोवती रिंगण करून कीर्तनात दंग झालेले वारकरी असे हे चित्र आहे.

## विद्यार्थ्यांच्या निर्णायक विजयासाठी भव्य कॅन्डल मार्च !

■ पुणे (दै. संध्या)

गेल्या दशकभरापासून भारतातील तरुणाईच्या मनात असंतोष साचला आहे. NEET परीक्षेचा पेपर फुटला, या नैराश्यात २३ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आणि विद्यार्थ्यांच्या भावनांचा कडेलोट झाला. विद्यार्थ्यांच्या आत्महत्येस जबाबदार असलेल्या, शिक्षण व्यवस्था उध्वस्त करणाऱ्या धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा इतकी साधी विद्यार्थ्यांची मागणी होती. मात्र सत्तेच्या मग्रुरीत असलेल्या मोदी सरकारने विद्यार्थ्यांच्या या मागणीकडे दुर्लक्ष केलं. शेतकऱ्यांचे आंदोलन जसं पोलिस बळाचा वापर करून चिरडून टाकलं तसंच विद्यार्थ्यांचं आंदोलनही चिरडून टाकू अशी हवा मोदी सरकारच्या डोक्यात होती. मात्र, विद्यार्थ्यांनी देशव्यापी संघर्ष उभा केला, काँग्रेसचे नेते तथा लोकसभेचे विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी "छात्रों की गुंज" या देशव्यापी मोहिमेतून जी क्रांतीची मशाल पेटवली आणि या क्रांतीच्या शक्तीपुढे मग्रूर मोदी सरकारला झुकावं लागलं. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आणि जवळपास २८ दिवसांच्या संघर्षाला यश आले. मात्र, या २८ दिवसांत एक गोष्ट प्रकर्षाने पुढे आली. "धर्मेंद्र प्रधान" हा प्रश्न खूप छोटा असून, मोदी सरकारचा अहंकार हा मुख्य प्रश्न म्हणून पुढे आले. मोदी सरकारने विद्यार्थ्यांवर पोलिसांचे बळ वापरले, मोर्चात भाजपाचे गुंड घुसवले, विद्यार्थ्यांवर टिअर गॅसचा, पॅलेट गनचा वापर केला, भाजपच्या मंत्र्यांनी विद्यार्थ्यांना दहशतवादी संबोधले, त्यांचे आयुष्य उध्वस्त करण्याची उघड धमकी दिली... हे चित्र पाहून मोदी सरकारचा अहंकार हा सर्वांत मोठा प्रश्न आहे ही बाब समोर आली.

# वारकऱ्यांच्या मागण्यांसाठी पंढरपूर येथे 'वारकरी महाअधिवेशन' संपन्न!

**वारकरी संप्रदाय आणि हिंदु धर्म यांच्यात फूट पाडण्याचे कटकारस्थान रचणाऱ्यांच्या विरोधात संघटित होण्याचा निर्धार!**

■ पुणे (दै. संध्या)



वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राचा कणा असून महाराष्ट्र जोडण्याची शक्ती या संप्रदायात आहे. काही निधर्मी, डावे आणि पुरोगामी त्याला खिळखिळा करण्याचा प्रयत्न करत आहेत. वारकरी संप्रदाय हा सर्वसमावेशक असून त्याने वेळोवेळी समाजाला दिशा देण्याचे काम केले आहे. अशा वारकरी संप्रदायात वारकरी आणि हिंदु धर्म वेगळे असल्याचे भासवण्याचे षड्यंत्र चालू आहे. वारकरी संप्रदाय आणि हिंदु धर्म यांच्यात फूट पाडण्याचे कटकारस्थान रचणाऱ्यांच्या विरोधात संघटित होण्याचा निर्धार वारकरी महाअधिवेशनात करण्यात आला. वारकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी सद्गुरू श्री गंगागिरी महाराज मठ येथे आयोजित वारकरी महाअधिवेशनात हा निर्धार व्यक्त करण्यात आला.

'श्री क्षेत्र गोदावरी धाम बेट सरला'चे महंत गुरुवर्य प.पू. रामगिरी महाराज यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या महाअधिवेशनात १००० हून अधिक वारकरी आणि भाविक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदु जनजागृती समितीचे श्री. धनंजय बोकडे यांनी केले, तर श्री. विनोद रसाळ यांनी अधिवेशनाचा उद्देश स्पष्ट केला. या अधिवेशनात वारकरी संप्रदायातील हिंदुत्वासाठी कार्य करणारे वारकरी महाराज आणि पूजनीय संत यांना 'घुसखोर' संबोधून त्यांचा अवमान करणाऱ्या तथाकथित पुरोगाम्यांचा जाहीर निषेध करण्यात आला, तसेच हिंदुत्वनिष्ठ व संत यांचा ज्ञानेश्वर माउलींची मूर्ती भेट देऊन जाहीर सन्मान करण्यात आला. या प्रसंगी इंचगिरी मठाचे मठाधिपती सुदर्शन महाराज, राष्ट्रीय वारकरी परिषदेचे ह.भ.प. रामदास महाराज चौधरी आणि ह.भ.प. दत्तात्रय चोरघे महाराज यांसह विविध मान्यवर उपस्थित होते.

विशेष सन्मान : हुपरी (कोल्हापूर) येथे विविध मार्गांनी आंदोलन करून अवैध मदरसा पाडण्यास भाग पाडणारे श्री. नितीन काकडे, पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील श्री विठ्ठलाच्या मूर्तीच्या रासायनिक लेपनाच्या विरोधात न्यायालयीन लढा देणारे श्री. गणेश लंके, तसेच गोरक्षणाच्या कार्यात सातत्याने काम करणारे राष्ट्रीय वारकरी सेनेचे उपाध्यक्ष ह.भ.प. अंभोरे महाराज कारभारी यांचा संत ज्ञानेश्वर माउलींची मूर्ती देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

हिंदू इतिहासातून शिकत नाहीत आणि आपण संघटित नाही. त्यामुळेच अनेक आक्रमकांनी आपल्यावर राज्य केले. धर्मावर होणाऱ्या आघातांविषयी आपण जागृत नसल्याने आज अन्य धर्मीय आणि चुकीचे विचार पसरवणाऱ्यांचे फावत आहे. वारकरी संप्रदाय हा जगाला देण्याचे व जोडण्याचे काम करतो. अशा वारकरी संप्रदायाविषयी आज भ्रमित करणारे विचार पसरवले जात आहेत. 'समता' दिंडी काढली जात आहे. आज काही जण पंढरपूरचा पांडुरंग हा विठ्ठल नसून अन्य कुणीतरी असल्याचे सांगत आहेत. जगात धर्म एकच असून तो म्हणजे सनातन धर्म आहे. लोकांना आज हिंदु धर्माचे महत्त्व न समजल्याने ते अन्य पंथांत जात आहेत. 'लव्ह जिहाद'चे लोण आता प्रत्येक खेड्यापाड्यापर्यंत पोहोचले आहे. लहान मुलांचाही बुद्धिभेद करून त्यांना इस्लामच्या प्रार्थना शिकवल्या जात आहेत. गोवंश रक्षणाच्या संदर्भात सरकारने मे महिन्यात एक अध्यादेश काढला आहे. त्यानुसार एखाद्या परिसरात अवैध रीतीने गोहत्या झाल्यास त्याला पोलीस, तहसीलदार आणि प्रशासन तितकेच उत्तरदायी असणार आहे. हे लक्षात घेऊन आपण प्रशासनास गोहत्या थांबवण्यास भाग पाडले पाहिजे.

संघटित असलेल्या वारकरी संप्रदायात हेतुपुरस्सर दुफळी माजवण्याचे आणि त्यांचा जाणीवपूर्वक बुद्धिभेद करण्याचे काम चालू आहे. श्री विठ्ठलाच्या भक्तीचे वर्णन करणारे जगद्गुरू तुकाराम महाराज यांचे अनेक अभंग असतांना जाणीवपूर्वक 'अल्लाशिवाय कुणी श्रेष्ठ नाही', 'अल्ला दिलावे-अल्ला खिलावे', अशा प्रकारे केवळ एकांगी प्रसार करणारे फलक वारीच्या वाटेवर लावले जात आहेत. हे षड्यंत्र आपण वेळीच ओळखून ते हाणून पाडले पाहिजे. वारकरी संप्रदायात घुसलेले खरे घुसखोर कोण आहेत, हे सांगण्याची आता वेळ आली आहे. महाराष्ट्रासाठी वारकरी संप्रदाय प्राण असून हिंदु धर्म आत्मा आहे! दिल्लीतील कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनात पेपरफुटीच्या विरोधात चालू असलेल्या आंदोलनाच्या नावाखाली पोलिसांच्या गाड्या फोडण्यात आल्या, पोलिसांवर आक्रमण करण्यात आले. तिथे दंगलसदृश परिस्थिती होती. यात देशविरोधी घोषणा देण्यात आल्या. हे देशविरोधी षड्यंत्र आपण लक्षात घेऊन त्याविरोधात कृती करण्याचा निर्धार केला पाहिजे. विहिंपचे ह.भ.प. नारायण महाराज शिंदे म्हणाले, "वारकऱ्यांच्या भोळेपणाचा लाभ घेऊन काही लोक त्यांना निरनिराळ्या प्रकारची आमिषे दाखवून बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न करतात. तरी यापुढील काळात वारकरी संप्रदायात घुसलेले कीर्तनकार शोधून काढून त्यांना समोर आणणे आवश्यक आहे!" राष्ट्रीय वारकरी परिषदेचे प्रवक्ते ह.भ.प. महेंद्र महाराज म्हस्के म्हणाले, "सध्या देव, देश, धर्म यांच्यापुढे अनेक मोठी आव्हाने आहेत. संप्रदायासाठी काम करणारे अनेक लोक धर्माच्या व्यासपीठावर येऊन त्यांचे मत व्यक्त करण्यास घाबरतात; मात्र प.पू. वक्ते महाराज यांनी सांगितल्याप्रमाणे 'अगोदर आपण वैदिक सनातन हिंदू आहोत आणि मग वारकरी आहोत', हे नेहमी लक्षात ठेवावे लागेल." राष्ट्रीय वारकरी परिषदेचे प्रवक्ते ह.भ.प. निवृत्ती महाराज हल्ल्याळीकर म्हणाले, "महाराष्ट्र सरकारने गोवंश हत्याबंदी कायदा लागू केला; मात्र हा कायदा कठोर केला पाहिजे. सर्व तीर्थक्षेत्रे मद्य-मांसमुक्त केली पाहिजेत. इंद्रायणी व चंद्रभागा या पवित्र नद्या स्वच्छ झाल्या पाहिजेत."

# नाशिकमध्ये कोसळधारा, १३५ मिमी पाऊस

## ५१ झाडं, ५ घरं पडली, १०० जणांचं स्थलांतर, गंगापूर धरण १७ टक्क्यांवरून ८० टक्क्यांवर

■ नाशिक(दै. संध्या)

शहराला बुधवारी (दि. २३) रात्रीपासून मुसळधार पावसाने झोडपून काढले. बुधवारी रात्री साडेआठ ते गुरुवारी सकाळी साडेआठ या बारा तासांत १०० मिमी तर २४ तासांत १३७मिमी पावसाची नोंद झाली आहे. त्र्यंबकेश्वर आणि गंगापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या पावसामुळे गंगापूर धरण ८० टक्क्यांवरून १७ टक्क्यांवर गेले. त्यामुळे धरणातून सकाळपासून विसर्ग करण्यात आला असून गोदावरी नदीला पूर आला. यात अडकलेल्या दोघांची सुटका आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या दलाने केली, तर गणेशवाडी व मिलिंदनगर येथील ५०० जणांचे स्थलांतर करण्यात आले. काझीगढी येथे चार घरे कोसळली. तर पंचवटीत काळाराम मंदिराजवळील एक वाडा पडला. सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

पावसामुळे शहरातील रस्त्यांमध्ये पाणी साचल्याने वाहने रुतली, तर अनेक ठिकाणी वाहतूक संथ झाल्याने कोंडी झाली. इंदिरानगर, पाथर्डी, सिडकोसह काही भागात घरांमध्ये पाणी शिरण्याच्या घटना घडल्या. नाशिक शहरात रात्रीपासूनच बरसणाऱ्या पावसामुळे सकाळी जनजीवन विस्कळीत झाले. अनेक उद्योग व्यवसाय आणि विशेष करून शाळांमध्ये विद्यार्थी संख्या अत्यंत कमी होती. शहरात दिवसभरात झाडे पडण्याच्या ५१ घटना घडल्या. मोटारींवर झाडे कोसळल्याने अनेक ठिकाणी मोटारींचं नुकसानही झाले. गोदाकाठी अनेक दुकानांमध्ये पाणी शिरल्याने त्यांना साहित्य स्थलांतरीत करावं लागलं.



## 'नीट' परीक्षेतील पेपरफुटीचा बळी ठरला नाशिकचा यश;

■ नाशिक(दै. संध्या)

'नीट' परीक्षेतील पेपरफुटी आणि गैरव्यवहारप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी दिल्लीत सुरू असलेल्या आंदोलनात निफाड तालुक्यातील करंजी येथील अनिकेत गोसावी याची हाक हृदय पिळवटून टाकणारी ठरली. अनिकेतचा लहान भाऊ यश याने नीट परीक्षा दिली. मात्र, पेपर लीक झाल्याचे समजल्यावर तो नैराश्यात गेला आणि त्यातच त्याने पुनर्परीक्षेच्या एक दिवस अगोदर, २१ जूनला गळफास घेतला, असा जाहीर आरोप त्याचा भाऊ अनिकेत याने जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनात सहभाग घेतला. त्याच्या वडिलांनीसुद्धा याला दुजोरा दिला आहे.

नीट परीक्षेतील पेपरफुटी, त्यानंतरचा गोंधळ आणि पुन्हा परीक्षा देण्याची वेळ यामुळे यशच्या मनावर प्रचंड मानसिक ताण निर्माण झाला होता. त्यामुळेच त्याने टोकाचे पाऊल उचलले, असे वडील अशोक गोसावी यांनी बोलताना सांगितले.

यशच्या चेहऱ्यावरून, बोलण्यातून, वागण्यातून अशा निर्णयाची चाहूलही कुणाला लागली नव्हती, असे सांगताना त्यांना रडू कोसळले. देशात या प्रकरणानंतर चौकशा होतील, दोषींवर कारवाई होईल, नवीन नियम बनतील, परीक्षा व्यवस्थेत सुधारणा करण्याची आश्वासने दिली जातील; पण आमचा यश परत येणार आहे का?, असा शोकसंतप्त सवालही त्यांनी केला.




## भेसळखोरांच्या तोंडचे 'पाणी' पळाले; दूधसंकलन २० हजार लिटरने घटले

■ नाशिक(दै. संध्या)

राज्यभर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) दुधातील भेसळखोरांविरोधात सुरू केलेल्या धडक कारवाईचा थेट परिणाम आता नाशिक जिल्ह्यातील दूध व्यवसायावर दिसून येत आहे. गेल्या महिनाभरातील सलग धाडी, कृत्रिम दूध आणि भेसळयुक्त दूध जप्तीच्या कारवायांनंतर अनेक खासगी संकलन केंद्रांनी दूध खरेदी कमी केली असून, जिल्ह्यातील रोजच्या दूध संकलनात सुमारे २० हजार लिटरची घट झाल्याची माहिती दूध व्यवसायाशी संबंधित सूत्रांनी दिली. उशिरा झालेला पाऊस, हिरव्या चाऱ्याची टंचाई आणि एफडीएच्या कारवाईमुळे भेसळखोरांनी व्यवसायातून काढता पाय घेतल्याने संकलनात घट झाल्याचे सांगितले जात आहे. दुग्ध व्यवसायातील जाणकारांच्या मते, केवळ उत्पादनात घट झाल्याने एवढी मोठी तफावत निर्माण होणे शक्य नाही. याआधी संकलन साखळीत मिसळले जाणारे भेसळयुक्त अथवा कृत्रिम दूध आता बाजारातून कमी झाल्यामुळेच संकलनाचा आकडा घसरल्याची चर्चा आहे. त्यामुळे राज्यभर सुरू असलेल्या कारवाईमुळे दूध संकलनातील घसरण ही भेसळीच्या प्रमाणावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे. राज्यात एफडीएने गेल्या काही आठवड्यांत कृत्रिम दूध, डिटर्जंट, रिफाइंड तेल, स्टार्च, रसायने आणि दूषित पाणी मिसळून दूध तयार करणाऱ्या रॅकेटवर मोठी कारवाई केली. विविध ठिकाणी लाखो रुपयांचे भेसळयुक्त दूध जप्त करण्यात आले असून, अनेक आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईनंतर दूध संकलन केंद्रांवरही तपासणी वाढविण्यात आली आहे. एफडीएच्या धडक कारवाईनंतर दूध संकलनात अचानक झालेली मोठी घट अनेक प्रश्न उपस्थित करत आहे. जर उत्पादनात एवढी घट झाली नव्हती, तर यापूर्वी संकलनात येणारे अतिरिक्त दूध नेमके कोणते होते? दुग्ध व्यवसायातील जाणकारांच्या मते, कृत्रिम किंवा भेसळयुक्त दूध संकलन साखळीत मिसळले जात असल्याची शक्यता या घडामोडींमुळे अधिक बळकट झाली आहे. त्यामुळे संपूर्ण दूध पुरवठा साखळीची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी होत आहे.



### २५ टक्क्यांपर्यंत घट झाल्याचे चित्र.

कृत्रिम दूध तयार करताना डिटर्जंट, रिफाइंड तेल, स्टार्च, युरिया, सिंथेटिक रसायने, तसेच दूषित पाण्याचा वापर केला जातो. अशा दुधामुळे पोटाचे विकार, मूत्रपिंडांवरील ताण, यकृताचे आजार, पचनसंस्थेचे विकार, तसेच लहान मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे नागरिकांनी प्रमाणित व विश्वासार्ह स्रोतांकडूनच दूध खरेदी करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. पशुसंवर्धन विभागाच्या आकडेवारीनुसार गेल्या काही वर्षांत दुधाळ जनावरांची संख्या कमी होताना दिसून येत आहे. वाढता उत्पादन खर्च, मजुरांची कमतरता आणि दुग्ध व्यवसायातील घटता नफा यामुळे अनेक शेतकऱ्यांनी दुधाळ जनावरांचे पालन कमी केले आहे. परिणामी नैसर्गिक दूध उत्पादनावरही परिणाम होत आहे.

## त्र्यंबकेश्वरला वादळी वाऱ्याने पत्रे उडून भाविकांच्या अंगावर कोसळले, ३ जण जखमी

■ नाशिक(दै. संध्या)

त्र्यंबकेश्वर शहरातून बुधवारी रात्री (दि.२२) ८ वाजेच्या सुमारास पायी जाणाऱ्या भाविकांच्या अंगावर वादळी वाऱ्याने हवेतून उडून आलेले पत्रे कोसळल्याने तिघे जखमी झाले. त्यांना ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले आहे. यापैकी यवतमाळचे एक भाविक गंभीर जखमी असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

हवामान खात्याने नाशिकच्या घाटमाथ्याच्या परिसरात बुधवारी रेड आणि गुरुवारी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. यानुसार दिवसभर त्र्यंबकमध्ये जोरदार पाऊस झाला. वादळी वाऱ्याचा वेग सायंकाळी वाढल्याने रात्री ८ वाजता त्र्यंबक शहरातील मेनरोड येथे ही दुर्घटना घडली. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे एका रहिवाशाच्या घराचे पत्रे उडून रस्त्यावर येऊन पडले. त्याचवेळी तेथन आठ भाविकांचा समूह जात होता, त्यापैकी तिघे जण पत्र्याखाली



अडकून जखमी झाले. अमित सुभाष आढे (वय २०, रा. जोडमोहा, ता. कळम, जि. यवतमाळ) हा युवक गंभीर जखमी झाला आहे. स्थानिक नागरिक सुयोग वाडेकर आणि कौस्तुभ देशपांडे यांनी प्रसंगावधान राखून मुसळधार वादळी पावसाची तमा न बाळगता तत्परता दाखवून आढे यांना दुचाकीने त्र्यंबकेश्वर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात डॉ. वर्षा वरपे, डॉ. श्वेता रणदिवे आणि सहाय्यक धीरज गायकवाड यांनी त्यांच्यावर तातडीने आपत्कालीन प्राथमिक उपचार सुरू केले. प्राथमिक उपचार आणि प्रकृती स्थिर झाल्यानंतर पुढील विशेष उपचारासाठी त्यांना नाशिक येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी या घटनेची माहिती घेतली असून तहसीलदार, पोलीस यंत्रणेला परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. जिल्हा शल्यचिकित्सक आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता हेदेखील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन शाखा वैद्यकीय पथकाच्या संपर्कात आहेत. दरम्यान नाशिक जिल्ह्यात घाटमाथ्यावर मुसळधार पाऊस होत आहे. तसेच रात्रीपासून वादळी वारा देखील वेगाने वाहत असल्याने नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे रात्रीच्या वेळी नागरिकांनी घराबाहेर पडू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## फुटाळा हत्याकांड, कुख्यात 'जंगली पांडे' टोळीवर मकोका

■ नागपूर (दै. संध्या)

फुटाळा परिसरात झालेल्या खून प्रकरणातील कुख्यात जितेंद्र उर्फ जंगली शिवाकांत पांडे आणि त्याच्या टोळीवर पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा अन्वये मकोकाची कारवाई केली. टोळीप्रमूख पांडेसह तीन आरोपी आणि चार विधीसंघर्षित बालकांनी संगनमताने हा गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

२९ जून २०२६ च्या सायंकाळी ६.३० ते ७ च्या सुमारास फिर्यादी सलमान ईशाक शेख (३५) हे मित्रांसह गिट्टीखदान हद्दीतील फुटाळा तलाव ते वायुदल मार्गावरील भुट्ट्याच्या ठेल्याजवळ उभे होते. तेथे योगेंद्र उर्फ लाला शिवाकांत पांडे (२०) व त्याच्या साथीदारांनी किरकोळ कारणावरून वाद घालत त्यांच्यावर चाकूने हल्ला केला. यात असद खान व मयूर जाधव गंभीर जखमी झाले. डॉ. दंदे रुग्णालयात उपचारादरम्यान असद खान याचा मृत्यू झाला.

या प्रकरणी गिट्टीखदान पोलिसांनी गुन्हा दाखल करून जितेंद्र उर्फ जंगली शिवाकांत पांडे (वय २५), दीपक उर्फ प्रिन्स मनोज गुप्ता (१९), योगेंद्र उर्फ लाला शिवाकांत पांडे (२०) यांना अटक करून चार विधीसंघर्षित बालकांना ताब्यात घेतले होते.

तपासात जितेंद्र उर्फ जंगली पांडे हा टोळीप्रमुख असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्यासह टोळीतील सदस्यांविरुद्ध खून, खुनाचा प्रयत्न, मारहाण, अवैध शस्त्रे बाळगणे, विनयभंग, शिवीगाळ, अवैध दारू विक्री अशा गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे नोंद असल्याचे उघड झाले. त्यांच्या दहशतीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने वरिष्ठांच्या मंजुरीनंतर या प्रकरणात मकोका कायद्याची कलमे वाढविण्यात आली.

यातील मुख्य आरोपी पांडेसह सर्व आरोपी मध्यवर्ती कारागृहात असून, चार विधीसंघर्षित बालकांना बालसुधारगृहात ठेवण्यात आले आहे. प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलिस आयुक्त, सदर विभाग करीत आहेत.

## नाशिक जिल्ह्यातील ४ तालुक्यात भूकंपाचे धक्के, नागरिकांमध्ये घबराट!

■ नाशिक(दै. संध्या)

नाशिक जिल्ह्यात काल सुरगाणा तालुक्यात भूकंपाचे धक्के बसले होते. त्या पाठोपाठ मध्यरात्री चार तालुक्यांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले आहेत, त्यामुळे नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

नाशिक जिल्ह्यात काल सुरगाणा तालुक्यात भूकंपाचे धक्के बसले होते. त्या पाठोपाठ मध्यरात्री चार तालुक्यांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले आहेत, त्यामुळे नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुरगाणा तालुक्यात बोरगाव परिसरात रात्री ११ वाजून ५५ मिनिटांनी भूकंपाचा धक्का जाणवला तसेच सराड, चिखली, बोरगाव येथे पुन्हा रात्री २ वाजून ४५ मिनिटांनी वाजता भूकंपाचे धक्के बसले त्यामुळे सराड येथील शासकीय आश्रम शाळेच्या भिंतीला तडे गेले आहेत.

कळवण तालुक्यातील दळवट येथे ११:५६ वाजता सौम्य धक्के जाणवले. दिंडोरी तालुक्यातील ननाशी बाडगीचा पाडा येथे रात्री ११:५५ वाजता भूकंपाचा सौम्य धक्का बसला तर पेठ तालुक्यातील शिवशेत परिसरात रात्री २ वाजून ४४ मिनिटांनी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित हानी किंवा वित्त हानी झाली नसल्याचे जिल्हा प्रशासनाने कळवले आहे.



कळवण तालुक्यातील दळवट येथे ११:५६ वाजता सौम्य धक्के जाणवले. दिंडोरी तालुक्यातील ननाशी बाडगीचा पाडा येथे रात्री ११:५५ वाजता भूकंपाचा सौम्य धक्का बसला तर पेठ तालुक्यातील शिवशेत परिसरात रात्री २ वाजून ४४ मिनिटांनी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित हानी किंवा वित्त हानी झाली नसल्याचे जिल्हा प्रशासनाने कळवले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### गाडीच्या पार्किंगवरून वाद; तरुणावर हल्ला;

नागपूर (दैनिक संध्या) : कार पार्किंग करण्याच्या वादातून निर्माण झालेल्या वादामुळे एका लॉनच्या संचालकाने एका तरुणाला काठीने बेदम मारहाण केली. विजय तालेवार असे मारहाण करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. या घटनेमुळे रात्रीपर्यंत बजाजनगर ठाण्यात तणावाची स्थिती होती. तालेवार हे साई वाटीका लॉनचे संचालक आहेत. बजाजनगर चौकाजवळ तालेवार यांची साई वाटिका लॉन आहे. तर, या प्रकरणात जखमी झालेला जय अरविंद वानखेडे सिक्युरिटी गार्ड एजंसी चालवितात. नेहमी प्रमाणे पावणेपाचच्या सुमारास जय वानखेडे तेथे गार्ड चेकिंगसाठी गेले होते. त्याठिकाणी अस्तव्यस्त कार पार्किंग मुळे तालेवार यांना कार काढण्यास अडचण झाली. अनेकवेळा कार काढण्यासाठी आवाज देऊनही कुणी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे तालेवार संतप्त झाले. त्याचवेळी तेथे जय वानखेडे आले. बाचाबाची केल्यानंतर तालेवार यांनी बाजुचा दांडा उचलून जय वानखेडे यांना दोन तीन वेळा जोरदार फटके मारले. यावेळी त्यांचे साथीदार धाऊन आले. त्यामुळे तणाव निर्माण झाला. शिवीगाळ, धमक्या सुरू असतानाच दोन्ही गटाने बजाजनगर ठाण्यात धाव घेतली. तेथेही मोठ्या संख्येत समर्थक जमा झाल्याने तणावाची स्थिती निर्माण झाली होती. वृत्त लिहिस्तोवर पोलिसांकडून दोघांचेही जबाब घेण्याची प्रक्रिया सुरू होती. या मारहाणीच्या घटनेचा व्हिडीओ सोशल मिडियावर व्हायरल झाल्यामुळे उलटसुलट चर्चेला उधाण आले होते. या व्हिडिओत हे ड्रायव्हर हल्ला करताना स्पष्ट दिसत असून आरडा ओरड करत असल्याचेही दिसून येत आहे. दरम्यान जय हा आमदार विकास ठाकरे यांचा नातेवाईक असल्याचीही चर्चा होती. पोलीस स्टेशनमध्ये मध्यरात्री आमदार ठाकरे पोहोचले आणि त्यांनी संताप्त जमावाची समजूत काढल्याने मोठा अनर्थ टळला.

### संघ मुख्यालय संबंधात एक्सवर दिशाभूल करणारी पोस्ट; कोतवालीत गुन्हा दाखल

नागपूर (दैनिक संध्या) : राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) मुख्यालयाबाबत सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केल्याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 24 जुलै 2026 रोजी सकाळी 11.30 च्या सुमारास दिशाभूल करणारी पोस्ट आली होती. या पोस्टची प्राथमिक पडताळणी केल्यानंतर नागपूर येथील RSS मुख्यालयाला हजारो विद्यार्थ्यांनी घेराव घातल्याची कोणतीही घटना घडली नसल्याचे पोलिसांना आढळून आले. त्यामुळे नंतर पोलिसांनी पुढाकार घेऊन स्वतःहून कारवाईचा पवित्र घेतला. त्यानुसार संवेदनशील ठिकाणाबाबत अशा प्रकारची खोटी माहिती सोशल मीडियावर प्रसारित केल्यामुळे जनतेमध्ये भीती, संभ्रम व तणाव निर्माण होऊन सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते. हे ध्यानात घेऊन पोलीस हवालदार अनिल रामाजी बोद्रे (वय 48) यांनी तक्रार नोंदवली. त्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी म्हणून संबंधित X च्या अकाउंटधारकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 353(2), 505 तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यातील संबंधित कलमांन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. अशा दिशाभूल करणाऱ्या अनेक पोस्ट गेल्या आठवड्याभरात सोशल मीडियावर झाल्या आहेत. त्याची आम्ही चौकशी करीत आहोत. या संबंधाने अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही, अशी माहिती वजा प्रतिक्रिया पोलीस आयुक्त राहुल मदने यांनी दिली.

### आषाढी एकादशीनिमित्त कारागृहात भरली 'विठ्ठल नामाची शाळा'

नागपूर (दैनिक संध्या) : आषाढी एकादशीनिमित्त येथील मध्यवर्ती कारागृहात आज दिवसभर विठ्ठल नामाचा गजर झाला. विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याने बंदीवान अक्षरश: भारावून गेले होते. 'सुधारणा आणि पुनर्वसन' या संकल्पनेला अनुसरून आज 'कारागृहात विठ्ठल नामाची शाळा भरली'. सकाळी विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीसह पालखी मिरवणूक काढण्यात आली. कारागृहातील विविध विभागांतून ही पालखी फिरविण्यात आली. सर्व बंदींनी पालखीचे दर्शन घेत विविध कार्यक्रमात मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदविला. यावेळी संपूर्ण कारागृह परिसर "विठ्ठल-विठ्ठल" नामाच्या गजराने आणि भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला होता. त्यानंतर पांडुरंगाची भजने, अभंग गायन तसेच फुगडीसारखे पारंपरिक उपक्रम पार पडले. आषाढी एकादशीचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी उपवास करणाऱ्या बंदी जणांना कारागृह प्रशासनातर्फे उपवासाचे विशेष पदार्थ उपलब्ध करून देण्यात आले.

### मुलीचे अपहरण, बलात्कार आणि बळजबरीने धर्मांतर; चारजणांवर गुन्हा दाखल

नागपूर (दैनिक संध्या) : एका तरुणीच्या तक्रारीवरून मानकापूर पोलिसांनी तिच्या कथित पतीसह चारजणांविरुद्ध अपहरण, बलात्कार, बालविवाह, बनावट दस्तऐवज तयार करणे, मारहाण, बळजबरीने धर्मांतर आणि पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल केला. सोनेगाव परिसरात बळजबरीने धर्मांतर घडवून आणल्याचे प्रकरण समोर आल्याच्या अवघ्या काही दिवसांतच आता मानकापुरातही असा गुन्हा दाखल झाल्याने सर्वत्र उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुणी सध्या २१ वर्षांची आहे. तिच्या तक्रारीनुसार, मुख्य आरोपी समीर मुनीर अली (२४) याने ऑगस्ट २०२० मध्ये तिचे अपहरण केले होते. तेव्हा ती १६ वर्षांची होती. आरोपीने तिला आपल्याकडे ठेवले आणि स्वतःची पत्नी असल्याचे भासवून तिच्यावर वारंवार अत्याचार केले. वारंवार होणाऱ्या शरीरसंबंधामुळे ती आई बनली. तिचा मुलगा आता चार वर्षांचा आहे. तरुणीच्या आरोपानुसार, आरोपी समीरने तिचे एक बनावट आधार कार्ड तयार केले. ज्यात तिचे वय वाढवून तिला सज्ञान (१८ वर्षांपेक्षा जास्त) दाखवण्यात आले होते. या बनावट ओळखपत्राचा वापर करून आरोपी तिला अवस्थी चौकातील एका मदरशात घेऊन गेला. तेथे अझीझा मुनीर अली (४५) आणि मुनीर अली (५०) यांच्या उपस्थितीत एका अज्ञात मौलवीने त्यांचा निकाह लावून दिला होता. निकाहानंतर तिच्यावर बळजबरीने धर्मांतर करण्यासाठी दबाव आणला गेला. आरोपी समीर, अझीझा आणि मुनीर अली तिला वारंवार मारहाण करत असत आणि तिचा शारीरिक व मानसिक छळ करत असत, असाही आरोप तिने तक्रारीतून केला आहे.

### मध्यवर्ती कारागृहात शिजला 'जेल ब्रेक'सह गँगवॉरचा कट

नागपूर (दैनिक संध्या) : येथील मध्यवर्ती कारागृहात 'गँगवॉर' किंवा 'जेल ब्रेक'चा कट शिजल्याची दाट शक्यता प्राथमिक चौकशीतून पुढे आल्याने कारागृह प्रशासन आणि तपास यंत्रणांत प्रचंड खळबळ निर्माण झाली आहे. त्यामुळे या प्रकरणात मास्टर माईंड कोण आहे, ते शोधण्यासाठी 'आत-बाहेर' कसून चौकशी केली जात आहे. नागपूरसह ठिकठिकाणच्या कारागृहात अधून मधून वेगवेगळ्या प्रकारचे ड्रग्ज, मोबाईल सापडतात. ते घेऊन जाणारांना जेरबंद केल्याचे वृत्तही वारंवार येते. मात्र, कारागृहात कुणी घातक शस्त्र घेऊन जात नाही. कारण प्रवेशद्वारावर कैदी आणि त्यांना भेटणाऱ्या नातेवाईक, वकिलासह कारागृहात नियुक्तीला असलेल्या कर्मचारी, अधिकाऱ्यांचीही कसून तपासणी केली जाते. त्यामुळे सहसा कुणी तशी हिम्मत करीत नाही. दुसरीकडे कैद्यांमध्ये अंतर्गत वर्चस्वाचा वाद असतो. त्यांच्यात अनेकदा हाणामाऱ्या होतात. एकदुसऱ्याला धडा शिकविण्यासाठी कैदी आतमधील लोखंडी सळी, किंवा पत्र्यांच्या वस्तूंना, चमच्यांना घासून धारदार, टोकदार बनवितात आणि त्याचा शस्त्र म्हणून वापर करतात.

## थोडक्यात पण महत्वाचे

### महापौर रवि लांडगे यांचा दिल्ली दौरा यशस्वी; मांडला विकासाचा रोडमॅप...

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण आणि वेगवान विकासासाठी महापौर रवि लांडगे यांनी दिल्ली दौऱ्यात केंद्र सरकारसमोर शहराशी संबंधित महत्त्वाचे विषय प्रभावीपणे मांडत विकासाचा व्यापक रोडमॅप सादर केला. नागरिकांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांना न्याय मिळावा, शहराला केंद्र शासनाच्या विविध योजनांचा अधिकाधिक लाभ मिळावा आणि भविष्यातील विकास प्रकल्पांना गती मिळावी, या उद्देशाने त्यांनी विविध केंद्रीय मंत्र्यांच्या भेटी घेऊन सविस्तर चर्चा केली. प्रत्येक बैठकीत शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या मागण्या ठोसपणे मांडत त्यावर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन अंमलबजावणीला गती देण्याची मागणी करण्यात आली. महापौर श्री. लांडगे यांनी केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन पिंपरी-चिंचवडमधील रेड झोनचा गंभीर प्रश्न अधोरेखित केला. संरक्षण विभागाच्या निर्बंधांमुळे शहरातील लाखो नागरिकांना बांधकाम परवानग्या, पुनर्विकास, मालमत्ता व्यवहार, बँक कर्जे तसेच विविध विकासकामांमध्ये येणाऱ्या अडचणींची सविस्तर माहिती त्यांनी दिली. या प्रश्नावर संरक्षण मंत्रालय, महाराष्ट्र शासन, संरक्षण प्राधिकरण आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त बैठकीद्वारे नागरिकांना दिलासा देणारा कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी करण्यात आली. तसेच प्रत्यक्ष पिंपरी-चिंचवड शहराला भेट देऊन परिस्थितीची पाहणी करण्याचे निमंत्रणही देण्यात आले. यानंतर केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन पुणे–नाशिक राष्ट्रीय महामार्ग (एनएच-६०) आठपदरीकरणासाठी प्रलंबित भूमी संपादन प्रक्रिया तातडीने पूर्ण करून प्रकल्पाच्या कामास गती देण्याची मागणी करण्यात आली. तसेच भोसरी येथील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल तांत्रिकदृष्ट्या शक्य असल्यास कायम ठेवण्यात यावा आणि मुंबई–बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला तातडीने सुरुवात करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. या प्रकल्पांमुळे वाहतूक कोंडी कमी होऊन औद्योगिक, व्यापारी आणि आर्थिक विकासाला मोठी चालना मिळेल, असे महापौरांनी नमूद केले. केंद्रीय युवा व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्यासोबतच्या बैठकीत पिंपरी-चिंचवडमध्ये "मेयर्स कप" ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. तसेच शहरासाठी स्वतंत्र आणि सर्वसमावेशक क्रीडा धोरण तयार करण्यासाठी मार्गदर्शन, Khelo India आणि Fit India अभियानांतर्गत सहकार्य तसेच आवश्यक आर्थिक व तांत्रिक मदत उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

### उपवर्गीकरण म्हणजे समाजात फूट पाडण्याचा कुटिल डाव - मानव कांबळे

**पिंपरी : दैनिक संध्या**

अनुसूचित जातीच्या घटनात्मक आरक्षणाचे उपवर्गीकरण करणे म्हणजे समाजात फूट पाडण्याचा राज्य सरकारचा कुटिल डाव आहे. याला अनुसूचित जातीतील सर्व ५९ जातींचा तीव्र विरोध आहे. हे प्रस्तावित वर्गीकरण रद्द करण्यासाठी पिंपरी चिंचवड मधील अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समितीच्या वतीने शुक्रवारी (दि.२४ जुलै) भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जेष्ठ नेते मानव कांबळे यांनी दिली. ज्येष्ठ नेते देवेंद्र तायडे यांनी सांगितले की, शुक्रवारी सकाळी १०:३० वाजता, भक्ती शक्ती चौकातून निगडी येथील अप्पर तहसील कार्यालय पर्यंत महामोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर, रिपब्लिकन सरसेनानी आनंदराज आंबेडकर, आरपीआयचे महासचिव अविनाश महातेकर, माजी मंत्री बबनराव घोलप आदींना निमंत्रित करण्यात आले आहे. भारतीय संविधान, सामाजिक न्याय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या संरक्षणासाठी रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने एल्गार करण्याची वेळ आली आहे. या महामोर्चात लाखो नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन देवेंद्र तायडे यांनी केले. पिंपरी येथे बुधवारी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत यावेळी ज्येष्ठ नेते देवेंद्र तायडे, कमलेश वाळके, ज्ञानेश्वर कांबळे, बाळासाहेब भागवत, अ‍ॅड. उमेश खंदारे, बापू गायकवाड, सुरेश निकाळजे, गंगाताई धेंडे, प्रल्हाद कांबळे, राहुल सोनवणे, गुलाब पानपाटील, अंजना गायकवाड, बाळासाहेब रोकडे, प्रमोद क्षीरसागर गोपाळ मोरे, विशाल कांबळे आदी उपस्थित होते.

### सार्वजनिक स्वच्छतागृह अधिक सुलभ करण्यासाठी महापालिकेचा पुढाकार

**पिंपरी : दैनिक संध्या**

शहरातील सार्वजनिक आणि सामुदायिक स्वच्छतागृह अधिक स्वच्छ, सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सार्वजनिक स्वच्छतागृह धोरण तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या धोरणात नागरिकांच्या अपेक्षा आणि प्रत्यक्ष अनुभवांचा समावेश करण्यासाठी निगडी येथील ग. दि. माडगूळकर सभागृहात विविध समाजघटकांच्या प्रतिनिधींसोबत केंद्रित गटचर्चा आयोजित करण्यात आली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सार्वजनिक आणि सामुदायिक स्वच्छतागृहांसाठी स्वतंत्र धोरण तयार करण्यात येत आहे. अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागामार्फत धोरणाचा मसुदा तयार करण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यामध्ये नागरिकांच्या सूचना आणि अपेक्षांचा समावेश करण्यावर भर देण्यात येत आहे. गटचर्चेत ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, निवासी कल्याण संघटनांचे (आरडब्ल्यूए) प्रतिनिधी, तृतीयपंथी समाजाचे प्रतिनिधी तसेच विविध सामाजिक संस्थांच्या सदस्यांनी सहभाग घेतला. सार्वजनिक स्वच्छतागृहांची स्वच्छता, सुविधा, देखभाल, सुरक्षितता आणि व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी विविध सूचना यावेळी मांडण्यात आल्या.

### विवेकपूर्ण निर्णय घेण्याची क्षमता विकसित झाली पाहिजे - उद्योजक शंकर जाधव

**पिंपरी : दैनिक संध्या**

विद्यार्थ्यांनी प्रत्येक गोष्टीकडे चिकित्सक दृष्टीकोनातून पहावे आणि पाठ्य पुस्तकांशिवाय अवांतर ज्ञान मिळविणे, शिस्त, वृत्तपत्र वाचन, बाजारपेठेची समज आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून उच्च शिक्षण घ्यावे. व्यवस्थापन शास्त्र शिक्षणामुळे योग्य आणि अयोग्य यामधील फरक ओळखण्याची आणि विवेकपूर्ण निर्णय घेण्याची क्षमता विकसित झाली पाहिजे असे मार्गदर्शन टेक्नोक्राफ्ट इंडस्ट्रीजचे डायरेक्टर शंकर जाधव यांनी केले. कुलगुरू डॉ. संतोष सोनावणे यांनी पुणे मॅनेजमेंट स्कूलच्या चौथ्या बॅचचे स्वागत करताना पीसीईटीच्या समृद्ध शैक्षणिक वारशाचा उल्लेख केला. त्यांनी उद्योगाभिमुख अभ्यासक्रम, चॉईस बेस्ड शिक्षणपद्धती, नियमित औद्योगिक भेटी, उद्योगतज्ज्ञांशी संवाद, प्रोजेक्ट-आधारित शिक्षण आणि 'वन फॅकल्टी, वन इंडस्ट्री' याची माहिती दिली व स्वतःच्या विकासासाठी पूर्ण क्षमतेने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या च्या पिंपरी चिंचवड विद्यापीठाच्या येथे पुणे मॅनेजमेंट स्कूलमध्ये 'दीक्षारंभ २०२६–२७' या नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पीसीइटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, कुलगुरू डॉ. संतोष सोनावणे, एमइडीसी उपाध्यक्ष व पीसीयू गव्हर्निंग बोर्ड सदस्य सचिन इटकर, पीसीयू ग्रुप मॅनेजमेंट प्रोग्राम सल्लागार डॉ. गणेश राव, स्कूल ऑफ मॅनेजमेंट डीन डॉ. अमित पाटील, टेक्नोक्राफ्ट इंडस्ट्रीजचे डायरेक्टर शंकर जाधव, केपीआयटी एक्झिक्युटिव्ह बोर्ड सदस्य पंकज साठे, सीए प्रमोद जैन, प्राध्यापक विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. सचिन इटकर यांनी विद्यार्थ्यांनी विकसित भारत २०४७ च्या प्रवासात सक्रिय योगदान देण्याचे आवाहन केले.



# रमाईंचा त्याग आणि समर्पणच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यामागची खरी ताकद

■ पिंपरी (दै. संध्या)

त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर या संघर्ष, त्याग आणि समर्पणाची जिवंत प्रतिमा होत्या. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवमुक्तीच्या महान कार्याला खंबीर साथ दिली. बाबासाहेबांनी देशाला विचार, संविधान आणि स्वाभिमान दिला, पण त्या विचारांना उभं राहण्यासाठी जी शांत, नि:स्वार्थ ताकद लागते, ती रमाईंच्या रूपाने त्यांच्या पाठीशी होती. म्हणूनच पिंपरी येथे उभारण्यात येणारे माता रमाईंचे स्मारक म्हणजे केवळ एक वास्तू नसून त्याग, स्त्रीशक्ती आणि सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासाचे प्रेरणास्थान आहे, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक (भीमसृष्टी) लगतच्या मोकळ्या जागेत उभारण्यात येणाऱ्या त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टीचे भूमिपूजन केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर रवि लांडगे होते.

भूमिपूजन सोहळ्यास आमदार महेश लांडगे, उमा खापरे, शंकर जगताप, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, माजी मंत्री विजय गिरकर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, माजी महापौर तथा नगरसदस्य योगेश बहल, डॉ. वैशाली घोडेकर, शंकुतला धराडे, नगरसदस्य सिद्धार्थ बनसोडे, सारिका मासुळकर, राहुल भोसले, अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, कुशाग्र कदम, तुषार हिंगे, नगरसदस्य शत्रुघ्न काटे, राहुल कलाटे, डॉ. सुहास कांबळे, धर्मपाल तंतरपाळे, कुणाल व्हावळकर, बाबासाहेब त्रिभुवन, कुंदन गायकवाड, निलेश नेवाळे, सारिका गायकवाड, निकिता कदम, सोनम मोरे, रेश्मा भुजबळ, श्रुती वाकडकर, तृप्ती कांबळे, प्रियांका कुदळे, योगिता बारणे, अर्चना सस्ते, माजी नगरसेवक विकास डोळस, मारुती भापकर, अंकुश कानडी, माजी नगरसदस्या चंद्रकांता सोनकांबळे यांच्यासह पुणे महापालिकेचे उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसदस्य निलेश आल्हाट तसेच सहशहर अभियंता मनोज सेठिया, उप आयुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक व विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेली चळवळ ही केवळ एका घटकापुरती मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीच्या मुक्तीसाठीची होती, असे सांगत त्यांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव केला. " डॉ. बाबासाहेब नसते तर आम्हाला आज मुक्तपणे बोलण्याचाही अधिकार मिळाला नसता," असे ते म्हणाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत, शाळेच्या बाहेर बसून ज्ञान मिळवणाऱ्या बाबासाहेबांनी पुढे देशाला संविधान देत समानतेचा पाया रचला, ही बाब आजच्या व भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

बाबासाहेबांच्या आयुष्यातील संघर्षमय वाटचालीचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले, त्यांनी कधीही पैशाला प्राधान्य दिले नाही, तर ज्ञान, न्याय आणि मानवतेच्या मूल्यांसाठी आयुष्य अर्पण केले. त्यांच्या या प्रवासात त्यागमूर्ती रमाई भीमराव आंबेडकर यांचे मोलाचे योगदान होते. "अत्यंत हालअपेष्टा सहन करत माता रमाईंनी बाबासाहेबांच्या कार्याला ताकदीने साथ दिली. त्यांचा त्याग आणि समर्पण हीच खरी प्रेरणा आहे," असेही ते म्हणाले. तसेच आज समाजात शिक्षण, समानता आणि स्वाभिमानाचे जे वातावरण निर्माण झाले आहे, ते डॉ. बाबासाहेबांच्या कार्यामुळेच शक्य झाले आहे, असे सांगत त्यांनी उपस्थितांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला.

"आज कोणत्याही शाळेतून आम्हाला बाहेर काढण्याची कुणाचीही हिम्मत नाही, ही आमच्या पाठीशी असलेली डॉ. बाबासाहेबांची ताकद आहे," असे ठामपणे त्यांनी अधोरेखित केले.

पिंपरी चिंचवड येथे उभारण्यात येणारे माता रमाईंचे स्मारक देशातील तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी या प्रकल्पाच्या उभारणीसाठी प्रयत्न करणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले. "हा लढा दीर्घ होता, मात्र शेवटी त्याला यश मिळाले आहे,"

### गीतगायनाने भारावला भीमसृष्टी परिसर

त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टीच्या भूमिपूजन कार्यक्रमानिमित्त सुप्रसिद्ध लोकगायक आनंद शिंदे यांच्या गीतगायनाच्या कार्यक्रमाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या आवाजात सादर झालेल्या सामाजिक जाणीवा जागृत करणाऱ्या तसेच प्रेरणादायी गीतांनी उपस्थितांच्या मनावर ठसा उमटवला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला अभिवादन करणाऱ्या गीतांवर नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत टाळ्यांच्या गजरात दाद दिली. या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी पिंपरी चिंचवड परिसरासह शहराच्या विविध भागांतून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते 'अजित पर्व'चे प्रकाशन

■ पिंपरी (दै. संध्या)

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जीवनावर आधारित प्रकाश जाधव लिखित 'अजित पर्व' या चरित्रग्रंथाचे प्रकाशन उप मुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

गणेश कला क्रीडा मंच, पुणे येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात लेखक प्रकाश जाधव, कृषी मंत्री दत्तामामा भरणे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, हार्ट पब्लिकेशन, पुणेचे प्रकाशक विनोद शिंदे, अ‍ॅड. लक्ष्मण रानवडे, सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष आबासाहेब ढवळे, वसंतराव पाटील, संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतीश काळे, किरण खोत, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक आदी उपस्थित होते. 'अजित पर्व' हे पुस्तक एका वेगळ्या संकल्पनेवर आधारित आहे. या चरित्र ग्रंथाची सुरुवात अजित पवार यांच्या आयुष्यातील अखेरच्या दिवसापासून होते आणि त्यानंतर त्यांच्या जीवन प्रवासाचा मागोवा घेत घेत वाचकांना त्यांच्या बालपणापर्यंत घेऊन जाते. पुस्तकात अजित पवार यांचे राजकीय यश, त्यांची प्रशासकीय कार्यपद्धती, वेळेचे काटेकोर नियोजन, विकासाभिमुख दृष्टी, निर्णयक्षमता, स्पष्टवक्तेपणा, काका पुतण्याच्या नात्यातील गुंतागुंत, त्यांच्याभोवती निर्माण झालेले गैरसमज आणि त्यामागील वास्तव यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यात आला आहे.

## स्व. पवार जयंती निमित्त विविध स्पर्धा संपन्न

■ चिखली (दै. संध्या)

२३ जुलै रोजी श्री नागेश्वर विद्यालय मोशी भागशाळा चिखली येथे दिवंगत कर्तृत्ववान उपमुखमंत्री, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अजितदादा पवार साहेब यांच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

श्री नागेश्वर विद्यालय भागशाळा चिखली या ठिकाणी दादांच्या प्रतिमेचे पूजन करून स्पर्धेला सुरुवात झाली. पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी दादांच्या कार्याचा गुणगौरव करत आपले मनोगत व्यक्त केले .कार्यक्रमाचे अध्यक्ष अ‍ॅड. मा. प्रकाशराव मोरे व प्रमुख पाहुणे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मा. सुरेखा देशमुख यांनी भूषविले. नगरसेवक पिंपरी चिंचवड मा. विकास साने यांनी वृक्षारोपणासाठी झाडे उपलब्ध करून दिली. शालेय परिसरामध्ये वृक्षारोपण पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यालयाचे प्राचार्य मा .सानप सर, उपमुख्याध्यापिका मा. नाणेकर मॅडम, पर्यवेक्षिका मा. ठोंबरे मॅडम व पर्यवेक्षिका मा. पंडित मॅडम यांचे मार्गदर्शनाखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला .श्री नागेश्वर विद्यालय मोशी भागशाळा चिखली येथील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.

काही माणसं पदाने मोठी असतात.. काही कामाने मोठी असतात आणि मनानेही मोठी असतात.. महाराष्ट्राच्या इतिहासातील न भूतो न भविष्यति.. कामाचा माणूस.. कामाचाच माणूस म्हणून प्रत्येकाच्या गळ्यातील ताईत..

महाराष्ट्राला एका वेगळ्या उंचीवर नेण्याचं आपलं ध्येय आणि आपण घेतलेले कष्ट..प्रशासनाला लावलेली शिस्त..प्रत्येक कामातील आपली दूरदृष्टी.. समाजाभिमुख लोकहिताची आग्रहाने घेतलेली स्पष्ट भूमिका.. प्रत्येक क्षेत्रात असलेला आपला वावर.. कामाचा धडाका अगदी शेवटच्या क्षणी सुध्दा साक्ष देत होता. अशा भावना आपल्या भाषणातून व्यासपिठावरील मान्यवरांनी व्यक्त केल्या. रांगोळी प्रदर्शनात इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. सूत्रसंचलन सौ बुरुड मॅडम यांनी केले. आभार श्री बोरचटे सरांनी मानले.

## आषाढी एकादशी निमित्त राष्ट्रीय श्रमिक आघाडीचा भव्य दिंडी सोहळा

■ पिंपरी (दै. संध्या)

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त राष्ट्रीय श्रमिक आघाडी, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने शनिवारी (दि. २५ जुलै) भव्य दिंडी, कामगार वारकरी मेळावा व सांगता समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रमिक, वारकरी, व्यापारी, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्व धर्मीय भाविकांना वारकरी संप्रदायाची भक्ती, समता आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सलग दुसऱ्या वर्षी आयोजित करण्यात आल्याची माहिती राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष तथा कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी शुक्रवारी पिंपरी येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

भोसले म्हणाले की, दि. २५ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता संत तुकाराम नगर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातून दिंडीला प्रारंभ होईल. मंदिराचे व्यवस्थापन श्री दिनेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून, दिंडीत श्री विठ्ठल-रुक्मिणींची प्रतिमा, संत तुकाराम महाराजांची गाथा, संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी तसेच माऊलींची पालखी सहभागी होणार आहे.

तुकारामनगर, वल्लभनगर आणि महेशनगर परिसरातून मार्गक्रमण करत ही दिंडी दुपारी सुमारे २.३० वाजता आचार्य अत्रे रंगमंदिरात पोहोचेल. त्यानंतर कामगार वारकरी मेळावा, वैष्णव मेळावा, भजन-कीर्तन तसेच सांगता समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात देहू व आळंदी येथील कीर्तनकार, भजनी मंडळे, वारकरी, विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रात कार्यरत मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे. या दिंडीत सुमारे दोन ते अडीच हजार श्रमिक, वारकरी, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक सहभागी होणार असल्याची माहिती भोसले यांनी दिली. या कार्यक्रमासाठी विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे, आमदार महेश लांडगे, शंकरशेठ जगताप, आमदार अमित गोरखे, आमदार उमाताई खापरे, अमर साबळे, महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांना निमंत्रित करण्यात आले.

## कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांना 'शिक्षणमहर्षी' पुरस्कार जाहीर

■ पिंपरी (दै. संध्या)

शिक्षण क्षेत्रात दूरदृष्टी, सामाजिक बांधिलकी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांना राष्ट्रीय श्रमिक आघाडी, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने 'शिक्षणमहर्षी' या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त शनिवार, दि. २५ जुलै २०२६ रोजी आचार्य अत्रे रंगमंदिर, पिंपरी येथे आयोजित विशेष समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष तथा कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी आज (दि. २४) आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी बोलताना यशवंतभाऊ भोसले म्हणाले की, शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. हीच भूमिका स्वीकारत डॉ. पी. डी. पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात केलेले कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. विशेषतः कामगार, शेतकरी, ग्रामीण व मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण संस्थांनी गुणवत्ता, संशोधन, कौशल्य विकास आणि आधुनिक शिक्षणपद्धती यांचा प्रभावी संगम साधला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### चार महिने पोलिसांना गुंगारा देणारी आंतरराज्यीय घरफोड्यांची टोळी जेरबंद

चाकण : चार महिन्यांपूर्वी महाळुंगे (ता. खेड) येथील बंद दुकानाचे शटर उचकटून बारा लाख साठ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरणाऱ्या आणि तब्बल चार महिने पोलिसांना गुंगारा देणाऱ्या आंतरराज्यीय घरफोड्यांच्या टोळीचा उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने शनिवारी पर्दाफाश केला. याप्रकरणी निक्कुकुमार देवकी सिंग (वय २२), रंजनकुमार देवकी सिंग (वय २०), राजकुमार ऊर्फ प्रिन्सकुमार विजय पासवान (वय १९) आणि डिंपल पटेल विनोद सिंग (वय २६ सर्व रा. बिहार) यांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी कविता मदन कड या (दि.६ फेब्रुवारी २०२६) रोजी यात्रेनिमित्त आपल्या मूळ गावी गेल्या होत्या. त्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी दुकानाचे शटर उचकटून आत प्रवेश केला आणि कपाटातील सोन्याचे दागिने लंपास केले होते. गुन्हे शोध पथकाने सीसीटीव्ही फुटेज तपासले. मात्र ठोस धागादोरा न मिळाल्याने पोलिसांनी गोपनीय माहितीदारांचे जाळे सक्रिय केले. पोलीस अंमलदार संतोष काळे आणि शुभम खंडागळे यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली देत मुख्य आरोपी निक्कुकुमार देवकी सिंग हा चोरीचे सोने घेऊन बिहारमध्ये पळाल्याची माहिती दिली. मुख्य आरोपी पोलिसांना चकवा देण्यासाठी बिहार आणि कर्नाटकमध्ये सतत ठिकाणे बदलत होता. त्याला मदत करण्यासाठी त्याचा भाऊ रंजनकुमार सिंग यानेही सहकार्य केल्याचे तपासात समोर आले. पोलिसांनी चार महिन्यांहून अधिक काळ तांत्रिक विश्लेषण, मोबाईल लोकेशन आणि गोपनीय माहितीच्या आधारे सातत्याने पाठपुरावा केला. अखेर रंजनकुमार सिंग याला मुंबई येथून, तर मुख्य आरोपी निक्कुकुमार सिंग याला बंगळुरू येथून अटक करण्यात आली. पोलीस कोठडीत चौकशीदरम्यान आरोपींनी चोरीचे दागिने बिहारमधील सीतामढी येथे लपवून ठेवल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलीस पथकाने बिहारमध्ये जाऊन कारवाई करत १२ लाख ६० हजार रुपये किमतीचे १४ तोळे सोन्याचे दागिने हस्तगत केले. सदर कारवाई पोलीस उपआयुक्त श्वेता खेडकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिगंबर सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक कल्याण घाडगे यांच्या पथकाने केली.

### माऊलींच्या भक्तांसाठी पंढरपुरात भव्य भक्तनिवास; आषाढी एकादशीला भूमिपूजन

आळंदी : श्री क्षेत्र पंढरपूर येथे श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी (आळंदी देवाची) यांच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या भव्य भक्तनिवास इमारतीचा भूमिपूजन सोहळा आषाढ शुद्ध एकादशीच्या पावन मुहूर्तावर भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे होते. यावेळी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, विश्वस्त ॲड.राजेंद्र उमाप, योगी निरंजननाथ, चैतन्य महाराज कबीरबुवा, ॲड.रोहीणी पवार, पुरुषोत्तम पाटील तसेच अन्य मान्यवर, अधिकारी, वारकरी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आषाढी वारीनिमित्त तसेच वर्षभर पंढरपूरात दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी आणि माऊली भक्तांना सुरक्षित, सुसज्ज व सुलभ निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे भव्य भक्तनिवास उभारण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे राज्यभरातून येणाऱ्या लाखो भाविकांना मोठा दिलासा मिळणार असून वारकरी सेवेला नवी दिशा मिळेल, अशी भावना विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबुवा यांनी व्यक्त केली.

### कऱ्हामाई सामाजिक संस्थेचा 'स्वच्छ वारी, सुंदर वारी' उपक्रम उत्साहात संपन्न

पुरंदर : येथील श्री चतुर्मुख भैरवनाथ सेवा पंचक्रोशी प्रासादिक दिंडी सोहळा पालखीचे आषाढी वारीसाठी हरिनामाचा गजर करत प्रस्थान झाले. श्री भैरवनाथ सेवा पंचक्रोशी प्राथमिक सादिक दिंडी सोहळ्याचे अध्यक्ष संभाजी नाटकर, उपाध्यक्ष एकनाथ कटके, कार्याध्यक्ष जगन्नाथ कटके, सचिव ज्ञानेश्वर घारे, खजिनदार मारुती कटके, माजी अध्यक्ष नामदेव कुंजीर, दिंडी संयोजक बबनराव कटके, दिंडी नियोजक संपत घिसरे, भिकाजी कटके, पोपट दळवी, नामदेव कटके, दत्तात्रय काळे, प्रदिप नाटकर, पोपट दादा कटके, मारुती घिसरे, शहाजी लोणकर, नारायण कटके, रंजना कटके, शिवगंगा कटके, दादासाहेब कटके, शंकरनाना कटके, संजय दिनकर कटके,हनुमंत मानकर, मार्तंड दळवी, बबन कटके, तुकाराम कटके, संभाजी घिसरे, भरत गायकवाड, मारुती ज्ञा. कटके, शिवाजी पवार, तानाजी कटके, बाळकृष्ण कटके, उषा कटके, सुमन कटके आदींसह भिवरीकर ग्रामस्थ दिंडी सोहळ्याचे नियोजन करतात. ज्ञानोबा- तुकारामाचा गजर,टाळक री,मृदंगवाले,विणेकरी,खांदेकरी,पताकावाले यांनी धरलेला ठेका मन सुखावून सोडत होता. क-हा नदीची उपनदी चरणावती नदीच्या तीरावरील ऐतिहासिक भैरवनाथ मंदिरापासून श्री चतुर्मुख भैरवनाथ सेवा पंचक्रोशी दिंडी सोहळा पालखीचे प्रस्थान झाले होते.या सोहळ्यात आस्करवाडी,प ठारवाडी,नाटकरवाडी,घिसरेवाडी,विठ्ठलवाडी,आंबराईवाडी परिसरातील वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.यात प्रामुख्याने महिलांची संख्या उल्लेखनीय होती अशी माहिती पुणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनील लोणकर यांनी दिली पालखी सोहळ्याला निरोप देण्यासाठी पुरंदर पंचायत समितीचे माजी उपसभापती दत्तात्रय काळे, पुरंदर तालुका भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष दिलीपआप्पा कटके, पुरंदर तालुका भाजपा अध्यक्ष संदीप कटके, भाजप नेते किरण कटके,भिवरी गावच्या सरपंच मोनाली कटके, उपसरपंच मारुती कटके, भैरवनाथ सेवा मंडळाचे अध्यक्ष उत्तम कटके, माजी अध्यक्ष सखाराम कटके,उपाध्यक्ष संदीप लोणकर, तंटामुक्ती अध्यक्ष दत्तात्रय कटके, उपाध्यक्ष कैलास कटके, माजी अध्यक्ष हनुमंत कामठे, पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळ संचालक गुलाब घिसरे, माजी सरपंच संजय कटके, विशाल कटके, गोसावी बुवा तरुण मंडळाचे अध्यक्ष नवनाथ भिसे,माजी अध्यक्ष सागर कटके, विर नेताजी तरुण मंडळाचे अध्यक्ष चांगदेव घिसरे, माजी अध्यक्ष रामदास सावंत,भाऊसाहेब दळवी,बाबाजी घिसरे, बाळासाहेब कटके,उद्योजक सोपानशेठ कुंजीर, सतिश पांडुरंग कटके,म्हस्कूशेठ दळवी,माऊली दळवी,पोलीस पाटील सचिन दळवी, धोंडीबा कटके, महादेव अण्णा घिसरे,हरिदास दळवी, राजेंद्र ताम्हाणे,शिवाजी उर्फ बाबूशेठ कटके, शेखर कटके,प्रकाश कटके,उत्तम कटके, किरण कटके, रविंद्र परशुराम कटके, गणेश दळवी, अमोल कटके, सुनील गोफणे, रामदास कटके, महादेव फडतरे, अनिल ढवळे, अनिल कटके, पांडुरंग कटके, तुळशीदास दळवी, रविंद्र कटके, बाळासाहेब कटके,एस.पी.दळवी, हनुमंत साळुंखे, जयवंत साळुंखे, शरद कटके, पांडुरंग घिसरे मनोज घिसरे, संतोष घिसरे, बाबुराव कटके, भिकाजी कटके, मंगळ ढवळे, दादासाहेब ढवळे, संभाजी ढवळे, सुरेश राठोड, निलेश कटके, दादासाहेब गायकवाड, साहेबराव वाडकर, राजेंद्र लोणकर, बाळू दौलती नाटकर, कैलास घिसरे, विणेकरी मोहन चंद्रकांत कटके,पोपट सखाराम घिसरे,चोपदार दत्तात्रय पांडुरंग ताम्हाणे,मारुती महादेव कटके,आदींसह भिवरी पंचक्रोशीतील गावपुढारी,विविध संस्था, संघटना,मंडळांचे पदाधिकारी हजर होते. भिवरी पंचक्रोशीतील पालखी सोहळा भिवरी, बोपगाव, श्रीनाथवाडी, चांबळी, कटकेमळा,हिवरेमार्गे सासवडला पोहचला.गावोगावी पालखीचे जोरदार स्वागत झाले.हा पालखी सोहळा सासवड येथे संत सोपानकाका पालखी सोहळ्यात समाविष्ट झाला. गुरुवर्य कै. हभप परशुराम कटके व कै.हभप रघुनाथ मानकर व समस्त ग्रामस्थ भिवरी यांच्या प्रेरणेने व असंख्य दानशूर व्यक्तींच्या आर्थिक सहकार्याने सुरू झालेला श्री चतुर्मुख भैरवनाथ सेवा पंचक्रोशी प्रासादिक दिंडी सोहळा गेल्या १४वर्षापासून संत सोपानकाका पालखी रथापुढे दिंडी १३ क्रमांकावर असतो.

# विठ्ठलनामाच्या गजराने शिरूर शहर दुमदुमले

शिरूर (दै. संध्या)

आषाढी एकादशीचे औचित्य साधून आकांक्षा एज्युकेशनल फाउंडेशन संचलित आकांक्षा स्पेशल चाइल्ड स्कूल, शिरूर येथे दिव्यांग विद्यार्थ्यांची भक्तिमय आणि उत्साहपूर्ण पायी दिंडी मोठ्या उत्साहात पार पडली. विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि अभंगांच्या सुरावटीत निघालेल्या या दिंडीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

या सोहळ्याची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणी पालखीचे पूजन व आरती करून झाली. त्यानंतर विशेष विद्यार्थ्यांनी भक्तिभावाने पायी दिंडी काढत विठ्ठल नामाचा अखंड गजर केला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील निरागस आनंद, उत्साह आणि भक्तिभावाने उपस्थितांची मने जिंकली.

या प्रसंगी जिल्हा परिषद सदस्या कोमलताई वाखारे, पंचायत समितीच्या सभापती स्वातीताई घावटे, शिरूर नगरपरिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा ऐश्वर्याताई पाचर्णे जीवन विकास मंदिरचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र धनक, नगरसेविका संगीता मल्लाव, स्वाती साठे, आयशा सय्यद, भारतीय जनता पक्ष महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया बिराजदार, आदर्श सरपंच वर्षाताई काळे, आदिशक्ती महिला मंडळाच्या अध्यक्षा शशिकलाताई काळे, आकांक्षा फाउंडेशनच्या सभासद डॉ. वैशाली साखरे, सारिका पवार, प्रिया घोडे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांनी पालखीची आरती करून दिंडीचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी विशेष मुलांशी संवाद साधत त्यांच्या उत्साहाचे आणि सहभागाचे कौतुक केले. अशा धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांमुळे दिव्यांग विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, समाजात समावेशकतेची भावना बळकट होते आणि भारतीय संस्कृतीची मूल्ये जपली जातात, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. दिंडीत विद्यार्थ्यांसोबत पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि स्वयंसेवकांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. विठ्ठल नामाच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे उपस्थित नागरिकांनी मनापासून कौतुक केले.



या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आकांक्षा एज्युकेशनल फाउंडेशन व आकांक्षा स्पेशल चाइल्ड स्कूलच्या अध्यक्षा राणीताई चोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. विशेष मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सातत्याने शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि पुनर्वसनात्मक उपक्रम राबवत असून, आषाढी एकादशी निमित्त आयोजित करण्यात आलेला हा दिंडी सोहळा त्याचाच एक प्रेरणादायी आणि संस्मरणीय भाग ठरला.

## हिरवी मिरची व काकडीची उच्चांकी आवक

चाकण (दै. संध्या)

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांदा, दोडका, हिरवी मिरची व काकडीची उच्चांकी आवक झाली. पालेभाज्यांच्या बाजारात कोथिंबीर, मेथी व पालक भाजीचे भाव तेजीत राहिले आहेत. एकूण उलाढाल ५ कोटी ४० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १ हजार ४०० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव १,२०० ते २,८०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,९०० क्विंटल झाली. बटाट्याला कमाल भाव १,४०० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक ३५ क्विंटल झाली. लसणाचा कमाल भाव १५ हजार रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक २६० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयांपासून ते ५ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.



शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे : कांदा - एकूण आवक - १,४०० क्विंटल. भाव क्रमांक - १.२,८०० रुपये, भाव क्रमांक २. २,३०० रुपये, भाव क्रमांक ३. १,२०० रू. बटाटा - एकूण आवक - १,९०० क्विंटल.भाव क्रमांक १.१,४०० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३.७०० रुपये.

* फळभाज्या - फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

टोमॅटो - २७२ क्विंटल (१,००० ते २,२०० रू.), कोबी - १५५ क्विंटल (१,००० ते १,५०० रू.), फ्लॉवर - १७० क्विंटल (८०० ते १,२०० रु.), वांगी - ६४ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), भेंडी - ६४ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), दोडका - ४५ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), कारली - ५८ क्विंटल ( १,००० ते २,००० रु.), दुधीभोपळा - ३२ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - ८५ क्विंटल (८०० ते १,२०० रु.), फरशी - १४ क्विंटल (३,००० ते ५,००० रु.), वालवड - २४ क्विंटल (३,००० ते ५,००० रुपये), ढोबळी मिरची - ११२ क्विंटल (२,५०० ते ४,५०० रु.), चवळी - २४ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), शेवगा - १० क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), गाजर - १५५ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), गवार - ३४ क्विंटल (४,००० ते ६,००० रु. ), आले - १३० क्विंटल (१०,००० ते १५,००० रु. ).,

## तीन नूतनीकरण प्राप्त अंगणवाडीचे लोकार्पण

चाकण (दै. संध्या)

चाकण नगरपरिषदेच्या वतीने शहरातील तीन नूतनीकरण प्राप्त अंगणवाडींचे मोठ्या दिमाखात लोकार्पण करण्यात आले.

नगराध्यक्षा मनिषा गोरे व उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी यांच्या सहकार्याने महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे यांच्या विशेष निधीतून नूतनीकरण करण्यात आलेल्या अंगणवाडी केंद्र क्र. ७६ (एकतानगर), अंगणवाडी केंद्र क्र. ८० (राणुबाईमळा) आणि अंगणवाडी केंद्र क्र. ८४ (गोल्डन चौक) या तिन्ही अंगणवाडी केंद्रांचा लोकार्पण सोहळा अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाला. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा सुरेशभाऊ गोरे यांच्या हस्ते हा लोकार्पण सोहळा मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, नगरसेवक मंगेश कांडगे, समीर सिकिलकर, उद्योजक राहुल कांडगे, नगरसेविका साधना गोरे, आरती परदेशी, पूनम शेवकरी, एड. वर्षा शेवकरी, विजया तोडकर, स्वाती लेंडघर, अनिता घोगरे, राम गायकवाड, नेहा कुलकर्णी, योगेश राजापुरकर, उदय नांगरे, अमर इंगळे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगरसेवक मंगेश कांडगे, समीर सिकीलकर व योगेश राजापूरकर यांनी स्वागत केले.




## भटक्या कुत्र्याचा सहा महिन्याच्या चिमुकल्यावर जीवघेणा हल्ला

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर शहरात तहसील कार्यालयाच्या आवारात लहान मुलावर भटक्या कुत्र्याने हल्ला चढविल्याची घटना घडली. या हल्ल्यात हा लहान मुलगा गंभीर जखमी झाला आहे. शहरातील भटक्या कुत्र्यांचा मुद्दा ऐरणीवर आला असून नगरपालिका प्रशासनाने सर्वसामान्य नागरिक, लहान व शाळकरी मुले यांच्या सुरक्षेसाठी आता तरी भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली जात आहे.

सदरची घटना बुधवार दुपारी एकच्या सुमारास घडली. नवीन सुनील खराडे वय सहा महिने हा या हल्ल्यात गंभीर जखमी झाला आहे. शहरात तहसील कार्यालयाच्या आवारामध्ये नवीन प्रशासकीय इमारतीचे काम सुरू आहे. या कामावर सुनील खराडे हे बांधकाम कामगार म्हणून कामाला आहेत. दुपारच्या वेळी खराडे हे कामावर गेले होते तर नवीनची आई घराबाहेर कपडे धुण्याचे काम करत होती तर नवीन हा कापडाच्या झोळीत झोपलेला होता. याचवेळी येथील भटक्या कुत्र्याने झोपलेल्या अवस्थेत असलेल्या मुलावर हल्ला चढविला. या भीषण हल्ल्यात नवीनच्या हाताची दोन बोटे कुत्र्याने चावून गंभीर जखमी केली तर गाल आणि चेहऱ्यावरही खोल जखमा केल्या आहेत. नवीनच्या आईने आरडाओरड केल्यानंतर परिसरातील नागरिक मदतीला धावले व या लहान मुलाची कुत्र्यापासून सुटका केली. रक्तबंबाळ अवस्थेतील नवीनला तातडीने जुन्नर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. राहुल सरवदे यांनी प्राथमिक उपचार करून जखमांचे गांभीर्य लक्षात घेत पुढील उपचारासाठी ससून रुग्णालयात हलविले.

## टाकळी हाजीत माजी आमदारांच्या घराजवळ पत्र्याच्या दुकानाची टिप्परने केली वाताहात - सुमारे तीन लाख रुपयांचे नुकसान

कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथे भरधाव टिपरने दुकान उद्ध्वस्त केल्याची घटना घडली आहे. शिरूरचे माजी आमदार पोपटराव गावडे यांच्या घरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या पत्रा शेडमधील दुकानावर अज्ञात टिपर चालकाने मध्यरात्री टिपर घालून दुकान आणि पत्रा शेड जमीनदोस्त केले.या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी प्रियंशु बाबाजी गावडे (वय २४, रा. टाकळी हाजी, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.फिर्यादीनुसार, टाकळी हाजी गावातील एस.पी. पेट्रोल पंपाजवळ टाकळी हाजी–जांबूत रस्त्यालगत पत्रा शेडमध्ये चहा व बेकरीचे दुकान आहे १७ जुलैच्या मध्यरात्री मोठा आवाज झाल्याने शेजारील स्टॉक रूममध्ये झोपलेले गावडे बाहेर आले असता, एका टिपर चालकाने वाहन मुद्दाम तीन ते चार वेळा पुढे-मागे करून पत्रा शेड दुकानवर घातल्याचे दिसून आले.या घटनेत पत्रा शेड मधील दुकानासह साहित्याचे सुमारे तीन लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण असून संबंधित टिपर चालकाचा शोध घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रा. सुभाष शेटे, ९९७५६७४२८६ लक्षात घेत पुढील उपचारासाठी ससून रुग्णालयात हलविले.



१७ जुलैच्या मध्यरात्री मोठा आवाज झाल्याने शेजारील स्टॉक रूममध्ये झोपलेले गावडे बाहेर आले असता, एका टिपर चालकाने वाहन मुद्दाम तीन ते चार वेळा पुढे-मागे करून पत्रा शेड दुकानवर घातल्याचे दिसून आले.या घटनेत पत्रा शेड मधील दुकानासह साहित्याचे सुमारे तीन लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

# आषाढी एकादशी निमित्त भाविकांना फराळाचे वाटप

शिरूर (दै. संध्या)

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त वुमन्स सोशल फाउंडेशन, शिरूर व ओन्ली वुमन्स जिम यांच्या संयुक्त विद्यमाने भाविकांसाठी फराळ वाटपाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. वुमन्स सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा प्रिया बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या नियोजनातून हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान श्री विठ्ठलाच्या प्रतिमेचे पूजन व आरती करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित भाविकांना खिचडी, केळी आणि चहा यांचे प्रेमपूर्वक वाटप करण्यात आले. आषाढी एकादशीच्या भक्तिमय वातावरणात महिलांनी विठ्ठल नामाचा गजर करत अभंग, भजन आणि विठ्ठलाची गाणी सादर केली. तसेच पारंपरिक फुगड्यांचा आनंद घेत संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला.

या कार्यक्रमाला शिरूर नगरपालिकेच्या नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे, शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील, नगरसेवक सागर नरवडे, अमोल चव्हाण, माजी नगरसेवक संतोष शितोळे, रविंद्र धनक, मराठा महासंघाच्या शोभना पांचगे, आधारछाया फाउंडेशनच्या अध्यक्षा सविता बोरुडे, आदिशक्ती महिला मंडळाच्या अध्यक्षा शशिकला काळे, डॉ. वैशाली साखरे, भाजपाचे निलेश नवले, डॉ. सरोदे, शिवसेनेचे प्रमोद जोशी यांच्यासह पत्रकार संतोष शिंदे, भगवान मंदिलकर, अर्जुन बढे, सुदर्शन दरेकर, पापाभाई पठाण, शोभा परदेशी तसेच मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वुमन्स सोशल फाउंडेशनच्या सदस्या सुजाता पाटील, नीलमधू शर्मा, विजयालक्ष्मी उपाध्याय, जयश्री थिटे, मीराताई परदेशी, रोहिणी बढे, कविता परदेशी, नयना परदेशी, भारती शहाणे आणि सुष्टी करंजुले यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या नियोजनापासून फराळ वाटपापर्यंत




सर्व जबाबदाऱ्या त्यांनी उत्साहाने पार पाडल्या. तसेच महिला वर्गाचा मोठ्या संख्येने सहभाग लाभल्याने कार्यक्रमाला अधिक उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी वुमन्स सोशल फाउंडेशन आणि ओन्ली वुमन्स जिमच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे समाजात सेवाभाव आणि भक्तीची भावना अधिक दृढ होत असल्याचे मत व्यक्त केले.

विशेष म्हणजे, गेल्या दोन वर्षांपासून आषाढी एकादशीच्या निमित्ताने हा फराळ वाटपाचा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असून, दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक या उपक्रमाचा लाभ घेत आहेत. सामाजिक सेवा आणि धार्मिक परंपरेचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### ‘केडीसीसी’ बँकेला लावलेला दंड भरण्याची संजय घाटगे यांची तयारी

कोल्हापूर : रिझर्व्ह बँकेने केडीसीसी बँकेला लावलेला दंड भरण्याची तयारी माजी आमदार संजय घाटगे यांनी दर्शवली आहे. अन्नपुर्णा साखर कारखान्याच्या कर्जामुळे बँकेला कोणतीही तोशीस लागू देणार नसल्याची ग्वाही घाटगे यांनी दिल्याची माहिती वैद्यकीय शिक्षणमंत्री व बँकेचे अध्यक्ष हसन मुश्रीफ यांनी पत्रकातून दिली. मंत्री मुश्रीफ म्हणाले, केडीसीसी बँक राज्यात सर्वोत्कृष्ट असून, या बँकेवर लाखो शेतकरी, ग्राहक, ठेवीदार अवलंबून आहेत. रिझर्व्ह बँकेने काही तांत्रीक चूक काढली आणि दंड केला आहे. तो भरण्याची तयारी घाटगे यांनी दाखवली आहे. घाटगे यांची काहीही चूक नसताना बँकेला आकारलेला दंड त्यांनी स्वतः भरण्याचा मोठेपणा दाखविला. हा दंड माफ होण्याविषयी पुन्हा एक अपील करणार आहोत आणि त्यानंतर मग निर्णय घेऊ. तरीही ते आपल्या निर्णयावर ठाम राहिले आहेत. ‘अन्नपूर्णा’ प्रकल्पाला १८ जून २०१९ रोजी कर्ज दिले. त्यानंतर ३० सप्टेंबर २०२४ ला संजय घाटगे यांची तज्ज्ञ संचालकपदी नियुक्ती झाली. नाबार्डच्या आक्षेपानंतर घाटगे यांनी मार्च २०२६ला ‘अन्नपूर्णा’च्या अध्यक्षपदाचाही राजीनामा दिला. ही वस्तुस्थिती केडीसीसी बँकेच्यावतीने रिझर्व्ह बँकेला कळविलेली असतानासुद्धा दंड लावल्याचे मंत्री मुश्रीफ यांनी पत्रकात म्हटले आहे.

### पालिकांची मालमत्ता, त्यावर आता पैसेवाल्यांची सत्ता

कोल्हापूर : महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतींची स्वउत्पन्न येणाऱ्या मर्यादा दूर करण्यासाठी नगरविकास विभागाने या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या मालमत्तांच्या मुद्रीकरणाचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये या संस्थांचे रिकामे भूखंड, खुल्या जागा, निवासस्थाने, मनोरंजनाच्या जागा, बगिचे यासह अन्य मालमत्ता खासगी विकासकांच्या, ठेकेदारांच्या माध्यमातून विकसित करण्यास मान्यता दिली आहे. त्यातून उत्पन्न वाढवून ते शहराच्या विकासासाठी राबविण्याचे शासनाचे धोरण आहे. महाराष्ट्रातील नागरीकरणाचा वेग वाढला असून राज्यातील १४ कोटी लोकसंख्येपैकी ५१ टक्के लोकसंख्या ही शहरात राहत आहे. या शहरांचे व्यवस्थापन करणाऱ्या या स्थानिक स्वराज्य संस्थांना विकासकामांसाठी, दैनंदिन कामकाजासाठी आर्थिक बाबतीत केंद्र आणि राज्य सरकारवर अवलंबून राहावे लागते. आर्थिक बाबतीत अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. त्यामुळेच या संस्थांनी स्वत:चे शाश्वत उत्पन्नाचे मार्ग शोधणे अत्यावश्यक बनले असल्याचे शासनाचे मत आहे. त्यातूनची ही मालमत्ता मुद्रीकरणाची योजना पुढे आली आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या सार्वजनिक मालमत्तांचे उत्पन्न स्त्रोतांमध्ये परिवर्तन करण्याची प्रक्रिया म्हणजे मालमत्तांचे मुद्रीकरण.

### कोल्हापुरात अंबाबाई मंदिरातील पुरातन पाण्याचा हौद चोरीला गेलाय

कोल्हापूर : करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरातील प्राचीन पाण्याच्या हौदाची चोरी झाली असून त्याबाबत गुन्हा नोंद करावा, अशी तक्रार प्रजासत्ताक सामाजिक संस्थेचे दिलीप देसाई तसेच हर्षल सुर्वे यांनी जुना राजवाडा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांच्याकडे केली आहे. अंबाबाई मंदिरात सुरू असलेल्या दुरुस्ती आणि संवर्धनादरम्यान येथील प्राचीन व हेरिटेज पाण्याचा हौद आढळलेला नाही. येथे पूर्वी पाण्याचा हौद असल्याचे पुरावे आमच्याकडे आहेत, त्यामुळे ही चोरी संगनमताने झाल्याची शक्यता आहे. पाण्याच्या हौदाची झालेली चोरी आम्ही देवस्थान समिती, जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. त्यांनी गुन्हा नोंद केलेला नाही. पाण्याच्या हौदाची चोरी ही महाराष्ट्र प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळे आणि अवशेष कायद्यानुसार फौजदारी गुन्हा आहे. तरी याप्रकरणी फौजदारी एफआयआर दाखल करण्यात यावा, मंदिर परिसरातील सीसीटिव्ही फुटेज ताब्यात घेऊन या ठिकाणी पंचनामा करावा. कामगारांचे जबाब नोंदवून प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी तक्रार अर्जात केली आहे. ॲड. बाबा इंदुलकर, ॲड. सतिश नलवडे यांनी मंदिराच्या नुकसानीबाबत पोलिस अधिक्षक कार्यालयाला निवेदन दिले. अंबाबाई मंदिर जतन संवर्धनाचे काम चुकीचे होत असून त्यामूळे मंदिराच्या दगडांचे नुकसान झाले आहे. त्यानुसार अज्ञात व्यक्तींविरुद्ध तत्काळ एफआयआर, नोंदवावा, घटनेची निष्पक्ष चौकशी करावी घटनास्थळाचा तात्काळ पंचनामा करावा वापरण्यात आलेले इलेक्ट्रिक हँड ग्राइंडर व इतर यंत्रसामग्री जप्त करावी, संबंधित कंत्राट, कार्यादेश, प्रशासकीय मंजुरी, मोजमाप पुस्तिका, बिल, देयक नोंदी, तांत्रिक अहवाल व इतर सर्व कागदपत्रे जप्त करावीत, तज्ञ व्यक्तींकडून वैज्ञानिक पाहणी करून नुकसानाचा अहवाल द्यावा, अशी मागणी निवेदनात केली आहे.

### सीईटी सेलच्या संथ कारभाराचा अभियांत्रिकी प्रवेशांना फटका

कोल्हापूर : राज्य मंडळाचा बारावीचा निकाल मे महिन्याच्या सुरुवातीलाच जाहीर होऊनही राज्यातील अभियांत्रिकी पदवी प्रवेश प्रक्रिया अद्याप संथ गतीने सुरू असल्याने विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी ऑगस्ट महिना उजाडण्याची वेळ आली आहे. दुसरीकडे पुणे, मुंबई, कोल्हापूर आणि नागपूर परिसरातील अनेक खासगी विद्यापीठांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून अध्यापनालाही सुरुवात केली आहे. त्यामुळे सीईटी सेलच्या विलंबित प्रक्रियेचा फटका पारंपरिक अभियांत्रिकी महाविद्यालयांना बसत असून गुणवंत विद्यार्थ्यांचा ओघ खासगी विद्यापीठांकडे वळत असल्याचे चित्र आहे. राज्य मंडळाचा बारावीचा निकाल ५ मे रोजी जाहीर झाला. त्यानंतर एमएचटी-सीईटीच्या पीसीएम आणि पीसीबी गटांच्या परीक्षा एप्रिल-मे महिन्यात पार पडल्या, तर त्यांचे निकाल जूनमध्ये घोषित झाले. त्यामुळे जुलैच्या सुरुवातीलाच प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईल, अशी अपेक्षा विद्यार्थ्यांना होती. मात्र, नोंदणीला २ जुलैपासून सुरुवात झाल्यानंतरही मुदतवाढ देण्यात आली. आता पहिल्या कॅप फेरीसाठी पर्याय भरण्याची प्रक्रिया २८ जुलैपासून सुरू होणार असून, २ ऑगस्टला पहिल्या फेरीची जागावाटप यादी जाहीर होणार आहे. त्यानंतर आणखी तीन कॅप फेऱ्या आणि संस्थास्तरीय प्रवेश होऊन संपूर्ण प्रक्रिया १५ सप्टेंबरपर्यंत चालणार आहे. या विलंबामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### सरकारी नोकरीचे आमिष दाखवून 48 लाखांची फसवणूक,

कळे : सरकारी नोकरीचे आमिष दाखवून तरुणांची लाखो रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार कळे पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आला आहे. बनावट शासकीय शिक्के आणि कागदपत्रे तयार करून ४८ लाख रुपयांचा गंडा घातल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमृतराव किसन काळोखे (रा. राजापूर, ता. खटाव, जि. सातारा), सुरेश शामराव देसाई (रा. करजवाडे, ता. वाळवा, जि. सांगली), शिवाजी भाऊसाहेब मोहिते (रा. थेरगाव, पुणे) अशी संशयितांची नावे आहेत. बबन बाबूराव कुंभार (वय ५०, रा. वारनुळ, ता. पन्हाळा) यांनी फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादी व आरोपी हे एकमेकांच्या परिचयाचे होते. आरोपींनी फिर्यादी यांच्या मुलांना साताऱ्यात आरोग्यसेवक पदासाठी १५ लाख रुपये आणि रेल्वेमध्ये टीसी पदासाठी २० लाख रुपये लागतील, असे सांगून एकूण ३५ लाख रुपयांची मागणी केली होती. हा सर्व व्यवहार २७ ऑगस्ट २०२४ ते २२ मे २०२६ या कालावधीत झाला.



# कोल्हापुरात पाऊस मंदावला

## पंचगंगेची पाणी पुन्हा पात्रात; २३ बंधारे पाण्याखाली, ६ रस्ते वाहतुकीसाठी बंद

■ कोल्हापूर(दै. संध्या)

जिल्ह्यात शुक्रवारी ऊन-पावसाचा पाठशिवणीचा खेळ सुरू असून पावसाचा जोर कमी झाल्याने धरणांमध्ये होणारी पाणीसाठ्याची वाढ मंदावली आहे. पंचगंगा नदीचे पाणी पुन्हा पात्रात आले असून पातळी २९.७ फुटांपर्यंत खाली आली आहे. जिल्ह्यातील प्रमुख धरणांमध्ये पाणीसाठा समाधानकारक असून राधानगरी धरण ८७.५४ टक्के भरले आहे.

दिवसभरात गगनबावडा तालुक्यात सर्वाधिक म्हणजे १६.५ मिमी पाऊस पडला असून सरासरी फक्त ४.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. २३ बंधारे पाण्याखाली आहेत. पावसामुळे ३ राज्यमार्ग आणि ३ प्रमुख जिल्हामार्ग असे एकूण ६ रस्ते वाहतुकीसाठी बंद आहेत.

सकाळी ऊन आणि दुपारनंतर ढगाळ वातावरणासह काही ठिकाणी पावसाच्या सरी अशी परिस्थिती दिवसभरात होती. हवामानातील या बदलामुळे वातावरणात काहीसा उकाडाही जाणवत होता. अधूनमधून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळत असल्या तरी पावसाचा वेग कमी झाल्यामुळे जिल्ह्यातील प्रमुख धरणांमधील पाणीसाठ्यातील वाढ अपेक्षेपेक्षा कमी होत आहे.शुक्रवारी सायंकाळी ४ वाजताच्या पाटबंधारे विभागाच्या अहवालानुसार राधानगरी धरणात ७.३२ टीएमसी पाणीसाठा असून धरणक्षेत्रात गेल्या ८ तासांत २८ मिमी पावसाची नोंद झाली. वारणा धरणात २७, दूधगंगा धरणात १२.६३, तुळशी धरणात २.४५, कासारी धरणात २.४५, कुंभी धरणात १.८२ टीएमसी पाणीसाठा आहे. वारणा धरणात ७८.४९ टक्के, तर दूधगंगा धरणात ४९.७५ टक्के पाणीसाठा झाला आहे. घटप्रभा, जांबरे, सर्फनाला आणि कोदे धरण शंभर टक्के भरले आहे. अलमट्टी ८६.३८ टक्के, कोयना ६७.३४ टक्के आणि हिप्परगी ४५.८३ टक्के भरले आहे. पावसामुळे शुक्रवारी जिल्ह्यात ९ ठिकाणच्या मालमत्तेचे तीन लाख १० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. आतापर्यंतचे एकूण अंदाजित नुकसान १ कोटी ४० लाख ५०० रुपये इतके झाले आहे.

## काँग्रेसच्या काळात पेपरफुटी झाली तर तुम्ही झोपा काढत होता का : सतेज पाटील यांचा सवाल

■ कोल्हापूर (दै. संध्या)

काँग्रेसच्या काळात पेपरफुटी झाली, असे भाजपवाले सांगत असले तरी त्यावेळी ते झोपा काढत होते का? त्याचवेळी भाजपने रस्त्यावर उतरून आंदोलन का केलं नाही, असा सवाल काँग्रेसचे विधानपरिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना केला.

आमदार पाटील म्हणाले, आता



विषयांतर करण्यासाठी, स्वतःची चूक झाकण्यासाठी हे प्रयत्न सुरू आहेत. लोकांमधील उद्रेक हा राजकीय उद्रेक आहे, असे भासवत आहेत आणि यातली हवा काढून घेण्याचे काम भाजप करत आहे. मात्र, हा जनक्षोभ आहे, काँग्रेस नेहमीच यासंदर्भात आवाज उठवत राहणार असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले.

सरकार हे आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न करत आहे. मुलांच्या खिशात पुडी टाकू, असे पोलिसांनी म्हणणे म्हणजे गृह खात्याचे अपयश आहे. पोलिसांच्या माध्यमातून हे आंदोलन दडपण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही आमदार पाटील यांनी केला.

सध्या युवकांचा रोष आणि धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा होणे गरजेचे असल्याकडेही आमदार पाटील यांनी लक्ष वेधले. महाराष्ट्रातही दबावाचे राजकारण आंदोलकांवर केले जात आहे. मात्र, त्याला बळी पडणार नाही. जर असे गुन्हे दाखल केले तर महाराष्ट्र काँग्रेस न्यायालयात मदत करणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

## टोल वसुलीप्रश्नी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करा

■ कोल्हापूर (दै. संध्या)

कोल्हापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील टोल वसुली, तसेच रस्त्यांवरील खड्ड्यांच्या प्रश्नांसंदर्भात दाखल करण्यात आलेली याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचमधील गुरुवारी (दि. २३ जुलै) झालेल्या सुनावणीत याचिकाकर्त्याच्या विनंतीवरून मागे घेण्यात आली.

याचिका ही सर्वसाधारण स्वरूपाची असून, ती प्रत्यक्षात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी दाखल करण्यात आलेल्या कार्यवाहीसारखी असल्याने तिची अशा स्वरूपात सुनावणी होऊ शकत नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. खराब रस्त्यांवर वाहनधारकांकडून टोल आकारणी करता येणार नाही, या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यासंबंधीच्या सूचना सरकार पक्षाला देण्यात आल्या.

## पेट्रोल ओतून वृद्धेला जिवंत जाळण्याचा प्रयत्न

■ गडहिंग्लज (दै. संध्या)

पती-पत्नी यांच्यातील वादाला कारणीभूत असल्याचा राग मनात धरून अंगावर पेट्रोल ओतून ६५ वर्षीय वृद्ध महिलेला ठार मारण्याचा प्रयत्न तिच्या नातजावयाने केला. सुलोचना पांडुरंग कदम (वय ६५, रा. हसूरसासगिरी) असे गंभीर जखमी झालेल्या महिलेचे नाव असून, हसूरसासगिरी येथील घटनेने गडहिंग्लज तालुक्यात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी गुरुनाथ शशिकांत शिंदे (वय ३१, रा. चिंचेवाडी, ता. गडहिंग्लज) याला पोलिसांनी अटक केली आहे.


पोलिस व ग्रामस्थांतून मिळालेली माहिती अशी, दीड वर्षापूर्वी चिंचेवाडी येथील गुरुनाथ आणि हसूरसासगिरी येथील किरण ऊर्फ प्रीती यांचा विवाह झाला आहे. गुरुनाथ हा येथील हॉटेलमध्ये कामाला आहे. त्यांना सहा महिन्यांचा मुलगा आहे.

## मंत्री हसन मुश्रीफ यांनी कारखान्यांना नियमबाह्य कर्जे दिली, अमित शाह यांचे लक्ष : पाटील

■ कोल्हापूर (दै. संध्या)

मंत्री हसन मुश्रीफ हे जिल्हा बँकेत अनेक वर्षे काम करत आहेत, त्यांच्या काळात जिल्ह्यातील साखर कारखान्यांसह जवळच्या व्यक्तींना नियमबाह्य कर्जे दिली आहेत. बँकेच्या कारभाराची अनेक कागदपत्रे माझ्याकडे आहेत, ते मोठे नेते आहेत. त्यांच्यावर केवळ आरोप करत नाही, वेळ येईल तेव्हा कागदपत्रे सादर करू. या कारभारावर केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांचे लक्ष असल्याची माहिती आमदार शिवाजीराव पाटील यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना दिली.

आमदार पाटील म्हणाले, मंत्री मुश्रीफ यांनी कितीही ओरडून सांगितले तरी त्यांच्या बोलण्यात व करण्यात फरक आहे. जिल्हा बँकेला यापूर्वी दोन लाखांचा आणि आता १३ लाखांचा दंड रिझर्व्ह बँकेने केला आहे. आतातरी त्यांनी गांभीर्याने घ्यावे. ‘हेरे सरंजाम’ प्रश्नांबाबत दिवंगत माजी आमदार नरसिंग पाटील यांनी हळद



लावली, पण लग्न महायुती सरकारने लावले. २२ हजार हेक्टर जमिनीचे काम आम्ही केल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले. हसन मुश्रीफ हे कागलपुरते मंत्री राहिले आहेत. त्यांनी महाराष्ट्राचाही विचार करावा. चंदगडसाठी एखादा दवाखाना, मोठे रुग्णालय तरी दिले का? त्यामुळे आमची चीड असल्याचे पाटील यांनी सांगितले. उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळात सतेज पाटील हे मंत्री होते. त्यावेळी किती घोटाळे झाले, हे त्यांनी बारीक लक्ष देऊन बघावे. ज्या परीक्षांमध्ये घोटाळे झाले ती लोकं काँग्रेसची आहेत. सतेज पाटील पक्षीय राजकारण करत असल्याचा आरोप पाटील यांनी केला.

## कोल्हापुरात पाच वर्षांत साकारणार आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम

■ कोल्हापूर (दै. संध्या)

आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्ययावत क्रिकेट स्टेडियम कोल्हापुरातील विकासवाडी येथे पुढील चार ते पाच वर्षांत साकारले जाणार असून, यासाठीची तांत्रिक समिती लवकरच निश्चित करण्यात येणार आहे. बत्तीस एकरातील या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात ३५ हजार बैठक व्यवस्थेच्या दोन स्टेडियमसह क्रिकेट संग्रहालय, इनडोअर क्लब हाऊसचा समावेश असल्याची माहिती कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष माजी खासदार संभाजीराजे छत्रपती आणि माजी अध्यक्ष बाळ पाटणकर यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

राज्य सरकारने जागा दिल्याबद्दल क्रिकेट असोसिएशन त्यांचे आभारी आहे. गेल्या ३५ वर्षांपासून केडीसीएने विशेषत: बाळ पाटणकर यांनी पाहिलेले स्वप्न यामुळे साकारले जाणार आहे. यामुळे कोल्हापूरची क्रीडानगरी म्हणून ओळख भक्कम होईल आणि कोल्हापुरी वारसा कायम ठेवला जाईल, असे संभाजीराजे म्हणाले. ते म्हणाले, यासाठी ६०० कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. पहिल्या टप्प्यात एमसीएने सहकार्याचा हात पुढे केला आहे. याशिवाय बीसीसीआय, प्रायोजक, लोकप्रतिनिधी, क्रीडाप्रेमी आणि दानशूर व्यक्तींच्या सहकार्यातून हे स्टेडियम उभे राहणार आहे. माजी अध्यक्ष बाळ पाटणकर म्हणाले, हे मैदान आयसीसीच्या सर्व निकषांनुसार विकसित केले जाईल. या स्टेडियमचा लाभ पश्चिम महाराष्ट्र, कोकण तसेच सीमा भागातील खेळाडूंना होणार आहे. ऋतुराज इंगळे म्हणाले, संभाजीराजे यांच्या प्रयत्नांमुळे शासनाकडून ही जागा कमीत कमी कालावधीत उपलब्ध झाली. आता सर्व पदाधिकाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे.



विभागीय क्रीडा संचालक सुहास पाटील म्हणाले, या स्टेडियमसाठी प्रथम कन्सेप्ट नोट तयार करून त्यानंतर तज्ज्ञ सल्लागार नेमले जातील. या प्रकल्पात क्रिकेट मैदानासह अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्र, स्विमिंग पूल, योगा सेंटर, फिजिओथेरपी सेंटर, जीम, क्रिकेट अकादमी आणि अन्य खेळांसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा तसेच भव्य पार्किंग, पर्यटन प्रकल्पासह मल्टीस्पोर्टस् हब विकसित होणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चाकण : रक्तदान शिबिरांची नितांत गरज - भगवान मेदनकर

चाकण (दैनिक संध्या) : रक्ताचा तुटवडा भासू नये म्हणून रक्त संकलित करण्याकरता रक्तदान शिबिरांची नितांत गरज असल्याचे विचार उद्योजक भगवान मेदनकर यांनी व्यक्त केले. चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात मार्गदर्शन करताना मेदनकर बोलत होते. यावेळी चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी यांचा सन्मान करण्यात आला. चाकण ब्लड बँकेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात दीडशे रक्तदात्यांनी रक्तदान केले. त्यांचा यावेळी शाल, श्रीफळ, मानचिन्ह व प्रशस्तीपत्र आणि रेनकोट देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. भगवान मेदनकर यावेळी म्हणाले, " रक्तदान शिबिरात सर्वांचा सहभाग असणे अत्यंत गरजेचे आहे. रक्ताचा एक थेंब माणसाचा जीव वाचू शकतो. अशा उपक्रमांची समाजाला गरज आहे." उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. धीरज वाळुंज यांनी स्वागत केले. संदेश जाधव यांनी सर्वांचे आभार मानले.



### अभंगवाणीच्या भक्तीरसात न्हाऊन निघाले ऐश्वर्यमचे भक्तगण

आकुर्डी (दैनिक संध्या) : ऐश्वर्यम् व्हेंचर सोसायटी येथे आषाढी एकादशी निमित्त आयोजित करण्यात आलेला "अभंगवाणी" हा भक्तिमय भक्तीगीत कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा कार्यक्रम अत्यंत भक्तिमय आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाला. विठ्ठल-रुक्मिणी पूजन, गणेश वंदना, अभंग गायन, नृत्य आणि संगीताच्या सुरेल मैफलीमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. कार्यक्रमाची सुरुवात शीतल अटलकर व संस्कार वर्गाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मंगलमय गणेश वंदनेने झाली. त्यानंतर शैलजा रामराजू, वैभवी देशपांडे, कु. आर्या पालखे आणि श्री. रोहित देव यांनी अभंग गायनाने उपस्थितांची मने जिंकली. वरदा वैशंपायन यांनी भरतनाट्यमच्या माध्यमातून सादर केलेल्या अभंगावर आधारित नृत्याविष्काराला विशेष दाद मिळाली. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरलेल्या स्वरगंधार ग्रुपने सादर केलेल्या अभंगवाणीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या सादरीकरणात मानसी नाटेकर, कु. सिद्धी देव, सोहम जोग, स्वप्निल चिल्लाळ, शुभम चिल्लाळ (ऑक्टोपॅड), विनीत नाटेकर (हार्मोनियम), निषाद नाटेकर (तबला) आणी भालचंद्र नाटेकर (निवेदन) यांनी उत्कृष्ट साथ-संगत करत कार्यक्रमाची उंची वाढवली . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश अवसेकर आणि आरती बुगदलवार यांनी केले, तर संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन धनंजय पुराणिक यांनी यशस्वीरित्या सांभाळले.उत्कृष्ट ध्वनीव्यवस्था अतुल पंढरपुरे यांनी सांभाळली. या भक्तिमय सोहळ्याने ऐश्वर्यम् व्हेंचर सोसायटी मध्ये एकात्मता, सांस्कृतिक जपणूक आणि विठ्ठलभक्तीचा सुंदर संदेश दिला.

### ‘बुंडीबुग्यो इबोला’ लसीचा पहिला मानवी डोस; जगातील पहिल्या चाचणीला सुरुवात

पुणे (दैनिक संध्या) : 'बुंडीबुग्यो इबोला' या विषाणूच्या प्रकाराविरुद्ध विकसित करण्यात आलेल्या जगातील पहिल्या लसीच्या मानवी चाचणीला प्रारंभ झाला आहे. ब्रिटनमधील ऑक्सफर्ड विद्यापीठात २४ जुलै रोजी पहिल्या स्वयंसेवकाला ही लस देण्यात आली असून, या जीवघेण्या आजारावरील उपचारांच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. इबोला हा संसर्गजन्य आणि जीवघेणा विषाणूजन्य आजार आहे. ताप, अशक्तपणा, उलट्या, जुलाब आणि गंभीर रुग्णांमध्ये अंतर्गत व बाह्य रक्तस्राव अशी याची प्रमुख लक्षणे आहेत. इबोला विषाणूचे अनेक प्रकार असले, तरी 'बुंडीबुग्यो' प्रकारासाठी अद्याप कोणतीही मंजूर लस उपलब्ध नाही. त्यामुळे या चाचणीकडे जागतिक आरोग्य क्षेत्राचे लक्ष लागले आहे. 'ऑक्सफर्ड व्हॅक्सिन ग्रुप' आणि 'पॅन्डेमिक सायन्सेस इन्स्टिट्यूट'च्या शास्त्रज्ञांनी ही लस विकसित केली आहे. विशेष म्हणजे, ऑक्सफर्ड-ॲस्ट्राझेनेका या कोविड-१९ लसीसाठी वापरण्यात आलेल्या तंत्रज्ञानाचाच आधार या लसीसाठी घेण्यात आला आहे. पुण्यातील सीरम इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने ही लस विकसित करण्यात आली असून तिच्या ६ लाख २० हजार डोसची निर्मिती केली आहे.

# नीरा येथे हजारो भाविकांनी घेतले विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन

## आषाढी एकादशी निमित्त भाविकांना खिचडीचा प्रसाद

नीरा (दै. संध्या)



आषाढी वारी सोहळ्याच्या परतीच्या प्रवासादरम्यान संत ज्ञानेश्वर माऊलींचा तर पंढरपूरला जाताना संत सोपान काका महाराजांचा दुपारचा विसावा नीरा येथील ज्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये होतो त्या मंदिरामध्ये भाविकांनी विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. या मंदिरामध्ये सकाळपासूनच भाविकांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. हजारो भाविकांनी यावेळी दर्शन घेतले.

आषाढी एकादशी निमित्त नीरा येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. नीरेतील भाविकांनी मोठ्या श्रद्धेने विठ्ठल रुक्मिणीच्या पायावर नतमस्तक होऊन दर्शन घेतले. शनिवारी सकाळी विठ्ठल रखुमाईच्या दर्शनासाठी मोठी रांग लागली होती. त्यावेळी भाविकांना खिचडी वाटप करण्यात आले. संत ज्ञानेश्वरी पारायण सोहळा समितीच्यावतीने सलग नऊ वर्षे हा उपक्रम राबवला जात आहे.

शनिवारी (दि.२५) पहाटे ॲड.आदेश गिरमे व मधुकर माने यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणी मुर्तीची विधिवत पुजा करण्यात आली. पूजाचे पौराहित्य सचिन घोडके यांनी केले. श्री ज्ञानेश्वरी पारायण व किर्तन महोत्सवात ट्रस्टच्या वतीने सकाळी शंभर किलो खिचडीचे वाटप करण्यात आले. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष प्रभुदयाळ अग्रवाल, जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष लक्ष्मणराव चव्हाण, कल्याण जेधे, चंद्रकांत धायगुडे, मदन चव्हाण, सुभाष पवार, संजय पवार, माणिकराव मस्के, विजय पवार, दिलीप पाटोळे यांनी खिचडी वाटप केले. परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुपारी नीरा भजनी मंडळाच्या सदस्यांनी भजनाचा कार्यक्रम सादर केला. ॲड. आदेश गिरमे यांच्यावतीने मंदिरात आकर्षक फुलांची सजावट केली होती.

नीरा येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये संत सोपान काकांचा पालखी सोहळा पंढरीकडे जात असताना दुपारच्या विसाव्यासाठी थांबत असतो. त्याचबरोबर श्री संत ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा जेव्हा परतीच्या प्रवासात असतो तेव्हा देखील हा सोहळा या विठ्ठल मंदिरामध्ये दुपारच्या विसाव्यासाठी थांबत असतो. या मंदिराला संतांच्या वास्तव्याचा आणि विठ्ठलाच्या मंगल निवासाचं वैभव लाभलं आहे. त्यामुळे परिसरातील अनेक भाविक भक्त ज्यांना आज पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी जाता आलं नाही त्यांनी या मंदिरामध्ये येऊन बा विठ्ठल आणि माता रुक्मिणी यांचं दर्शन घेतलं.

## तांबेवाडीत कृषी विभागाची ‘शेती शाळा’



यवत (दै. संध्या)

**आधुनिक तंत्रज्ञानाने ऊसाचे एकरी १०० टन उत्पादन घेण्याचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन**

महाराष्ट्र शासनाच्या शासन कृषी विभागामार्फत खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर विविध मोहिमांचे आयोजन दौंड तालुक्याचे तालुका कृषी अधिकारी अजिंक्य दुधाने यांच्या मार्गदर्शनाखाली केले जात आहे. याच उपक्रमांतर्गत तांबेवाडी येथे शेतीशाळा वर्गाचे आयोजन सहाय्यक कृषी अधिकारी विनायक जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. या शेती शाळेमध्ये ऊस पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी योग्य वाणाची निवड, लागवडीपूर्वी बेणे प्रक्रिया करण्याचे महत्त्व, एक डोळा पद्धत, पट्टा पद्धत तसेच ठिबक सिंचन यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानावर हवेलीचे सहाय्यक कृषी अधिकारी राजेंद्र भोसेकर व विनायक जगताप यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी तांबेवाडी सोसायटीचे चेअरमन विश्वास कोळपे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, कृषी विभाग राबवत असलेल्या शेतीशाळेमुळे कमी खर्च आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांचे उत्पादन वाढण्यास नक्कीच मदत होईल, असा विश्वास व्यक्त करून त्यांनी कृषी विभागाचे कौतुक केले. या शेतीशाळेला आबा कोळपे, सतीश कोळपे सर, मनोहर आबा कोळपे, सतीश धायगुडे, रोहिदास तांबे, दादासो कोळपे, तुकाराम तांबे, किशोर बहिरट, रणजीत कोळपे, मनोहर बाळा कोळपे, चेतन बहिरट, पवन तांबे, ओंकार कोळपे, अनिकेत कोळपे, रोहित कोळपे आणि गौरव कोळपे, साईराज कोळपे, अविष कोळपे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सलग दोन टर्मच्या खासदारांनी विकासकामांचा हिशोब द्यावा

### शिरूर लोकसभा निवडणूक लढणारच – शिवाजीराव आढळराव पाटील

शिरूर (दै. संध्या)



आगामी शिरूर लोकसभा निवडणूक आपण निश्चितपणे लढणार असून, मागील काही वर्षांत शिरूर लोकसभा मतदारसंघात ६०० कोटी रुपयांहून अधिक विकासकामे मार्गी लावली आहेत. त्यामुळे सलग दोन टर्म खासदार राहिलेल्या लोकप्रतिनिधींनी आपल्या कार्यकाळातील विकासकामांचा हिशोब जनतेसमोर मांडावा, असे आव्हान म्हाडाचे अध्यक्ष तथा माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केले.

शिरूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना आढळराव पाटील म्हणाले की, गेल्या पाच वर्षांत चाकण, आळंदी, जुन्नर, राजगुरूनगर, शिरूर आणि मंचर येथील नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करून विविध विकासकामे मार्गी लावण्यात आली. नागरिकांच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देत विकासाची गती कायम ठेवण्याचा आपला प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

पुणे–शिरूर रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे तसेच नाशिक फाटा–राजगुरूनगर महामार्गाच्या कामाचा कार्यादेश लवकर काढावा, अशी मागणी त्यांनी केली. चाकण–कुरळी–भोसरी परिसरात मोठ्या प्रमाणावर अवजड वाहनांची वाहतूक होत असल्याने या मार्गाचे काम अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुणे–नाशिक रेल्वेमार्ग जुन्नर–खेड परिसरातून जावा यासाठी आपण सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्यावर टीका करत, लोकसभा निवडणुकीत विमानतळ, चाकण वाहतूक कोंडी यांसारख्या मुद्द्यांवर मते मागितली; मात्र निवडून आल्यानंतर हे प्रश्न प्राधान्यक्रमावर राहिले नाहीत. तसेच इंद्रायणी मेडिसिटी प्रकल्पाचे पुढे काय झाले, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

"निवडणुकीच्या काळात भावनिक प्रचार करणे किंवा संसदेतील भाषणे सोशल मीडियावर प्रसारित करणे यामुळे जनतेचे प्रश्न सुटत नाहीत. भाषणांपेक्षा प्रत्यक्ष विकासकामे होणे अधिक महत्त्वाचे आहे," अशी टीकाही त्यांनी केली.

आगामी लोकसभा निवडणूक आपण लढणार असल्याचा पुनरुच्चार करत, मतदारसंघातील गावागावांत सातत्याने संपर्क ठेवून नागरिकांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

शिरूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शहराची हद्दवाढ ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त करत, हद्दवाढ झाल्यास मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होऊन शहराचा नियोजनबद्ध विकास साधता येईल, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल पाचर्णे, पंचायत समितीचे उपसभापती रामभाऊ सासवडे, नगरसेविका पूजा पोटावळे, नगरसेवक सागर नरवडे, उमेश शेळके, संतोष थेऊरकर, दिनेश मांडगे, निलेश पवार तसेच शिवसेनेचे शहरप्रमुख मयूर थोरात, सुरेश गाडेकर, तुषार जांभळे आदी उपस्थित होते.

## उड्डाण पुलाची निर्मिती करून वहातूक कोंडी सोडवावी : श्रमिक ब्रिगेडचे जिल्हा अध्यक्ष संतोष नाना डोळस

राजगुरुनगर (दै. संध्या)




वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नाशिकफाटा ते चांडोली टोलनाका दरम्यान मुख्य चौकात उड्डाण पूल उभारण्यात यावे या मागणीसाठी चाकण तळेगाव चौक येथे आम आदमी पार्टी आणि रिपाइं(आठवले) श्रमिक ब्रिगेडच्या वतिने आंदोलन करण्यात आले.

पुणे नाशिक महामार्गावरील नाशिक फाटा ते चांडोली टोलनाका या तीस किलोमीटरच्या रस्ता रुंदीकरणास केंद्र शासनाकडून यापूर्वीच मंजुरी देण्यात आलेली आहे परंतु राज्य शासनाकडून या रस्त्यारूंदीकरणासाठी लागणा-या आवश्यक जमीनीचे शंभर टक्के भूसंपादनाचे काम पुर्ण न झालेने सद्य परिस्थितीत काम सुरू करण्यास मंजुरी देता येत नाही असे केंद्रीय रस्ते मंत्री नितीन गडकरी यांनी स्वारगेट पुणे येथील जाहीर कार्यक्रमात सांगितले तसेच राज्य शासनाकडून माहे डिसेंबर २०२६ अखेर भूसंपादनाचे रखडलेले काम पुर्ण न झाल्यास केंद्र सरकारकडून निधीसाठी मिळालेली मंजुरी रद्द होण्याच्या मार्गावर असल्याचे मत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य प्रबंधक यांनी काही दिवसांपुर्वी चाकण येथील रस्ता पहाणी दरम्यान माध्यमांसमोर व्यक्त केलेले आहे यावरून हा प्रकल्प भविष्यात कित्येक वर्ष रखडणार असल्याचे चित्र स्पष्ट दिसून येत आहे त्यामुळेच दिनांक १८ जुलै २०२६ रोजी गणेश कला क्रिडा मंच स्वारगेट पुणे येथे नितीन गडकरी व देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन प्रसंगी हा रस्ता वगळून इतर तीन रस्त्यांच्या कामाचे नव्याने भूमिपूजन उद्घाटन करण्यात आले ह्या रस्त्यावर सध्याच्या वहातूक कोंडीचा प्रश्न भयान अवस्थेत आहे हि बाब कोणीही नाकारू शकत नाही सद्यस्थितीत कामगार विद्यार्थी रूग्ण शेतकऱ्याचा माल यासह विविध प्रकारच्या दळणवळणाची माल वहातूक करणारी वहाने सिग्नल चौकात उड्डाण पूल नसल्याने कित्येक तास अडकून वहातूक ठप्प होते त्यासाठी प्रत्येक चौकात नव्याने उड्डाण पूल उभारून सर्व नागरिकांची आणि माल वहातूकीची वहातूक कोंडीतून सुटका करण्यात यावी तसेच उड्डाण पूलाचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत पीएमआरडीए कडून आराखड्यात ह्या मुख्य रस्त्यालगत दाखवण्यात आलेल्या बायपास रस्त्यांची प्रथम प्राधान्याने कामे हाती घेऊन पुर्ण करण्यात यावी जेणेकरून बांधकाम काळात वहातूक कोंडी समस्या जास्त प्रमाणात निर्माण होणार नाही आणि वहानचालवणा-या नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होणार नाही असे मजकूराचे निवेदन आपचे तालुकाध्यक्ष स्वप्नील गायकवाड श्रमिक ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संतोषनाना डोळस यांनी प्रशासनास दिले.

# पिंगोरीच्या जवानांचे सर्वोच्च बलिदान भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी : पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील

## कारगिल विजय दिनानिमित्त शहीद स्मारकावर पुष्पचक्र अर्पण; सैनिकांच्या परंपरेचा गौरव, शहीदांना ग्रामस्थांची कृतज्ञ मानवंदना

नीरा (दै. संध्या)



“पिंगोरी येथील शहीद जवानांनी राष्ट्ररक्षणासाठी दिलेले सर्वोच्च बलिदान हे देशासाठी अभिमानास्पद असून, त्यांचे शौर्य आणि त्याग भावी पिढ्यांना देशसेवेची प्रेरणा देत राहील," असे प्रतिपादन जेजुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांनी केले. कारगिल विजय दिनानिमित्त रविवारी पिंगोरी येथील शहीद स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून कारगिल युद्धातील शहीद जवानांना मानवंदना देण्यात आली.

पुरंदर तालुक्यातील सैनिकांचे गाव म्हणून ओळख असलेल्या पिंगोरी येथे कारगिल विजय दिन देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कारगिल युद्धात हौतात्म्य पत्करलेले जवान शंकर शिंदे यांचे सुपुत्र रणजित शिंदे व माजी सैनिक यांच्या उपस्थितीत जेजुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या हस्ते शहीद स्मारकास पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. त्यानंतर ध्वजारोहण करून शहीद जवानांना अभिवादन करण्यात आले.

कारगिल युद्धात पिंगोरी येथील शहीद शंकर शिंदे यांना वीरगती प्राप्त झाली होती. तेव्हापासून पिंगोरी येथे दरवर्षी कारगिल विजय दिन साजरा करण्याची परंपरा जपली जात आहे. यावेळी सैन्यात कार्यरत जवान, माजी सैनिक, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांनी शहीदांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या शौर्यगाथेला उजाळा दिला.

पिंगोरी गावाला पूर्वापार समृद्ध सैनिकी परंपरा लाभली आहे. शिंदे सरदारांचे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या भूमीतील सैनिकांनी पानिपतच्या युद्धापासून पहिले व दुसरे महायुद्ध तसेच भारत-पाकिस्तान आणि भारत-चीन युद्धांमध्ये शौर्य गाजविले आहे. याच गावातील जवान रमेश शिंदे यांनी श्रीलंकेतील भारतीय शांतिसेनेत कार्यरत असताना वीरमरण पत्करले. या शूरवीरांच्या स्मृती जतन करण्यासाठी ग्रामस्थांनी उभारलेल्या शहीद स्मारकाला अभिवादन करून उपस्थितांनी राष्ट्रसेवेचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमास सरपंच संदीप यादव, प्रकाश शिंदे, जीवन शिंदे, पोलीस पाटील राहुल शिंदे, माजी सैनिक रामदास शिंदे, शामराव शिंदे, जयसिंग शिंदे, महादेव गायकवाड, अरुण शिंदे, चंद्रकांत शिंदे, दीपक शिंदे, संपत शिंदे, भरत शिंदे, मंगेश शिंदे, शिवाजी शिंदे, बाबुराव शिंदे, बाबासाहेब यादव, पोपट शिंदे, वसंत शिंदे, राजकुमार शिंदे, निलेश शिंदे, गोविंद शिंदे, प्रभारी मुख्याध्यापक शरद जगताप, शिक्षक सुधाकर सोनवणे, उमेश दुधाळ तसेच विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## या देशाची जनता मालक, लोकशाहीचा विजय : संदीप जगताप



जेजुरी (दै. संध्या)

### जेजुरीमध्ये निषेधसभेसह विजयोत्सव साजरा

दिल्ली येथील जंतर मंतर मैदानात झालेले आंदोलन -अमानुष लाठीचार्ज -देशभर उमटलेले पडसाद आणि त्यानंतर केंद्रीय शिक्षण मंत्री यांचा राजीनामा हे सत्ताधाऱ्यांचे अपयश तर आंदोलनात उतरलेल्या उज्वल भविष्य असलेल्या तरुणांचा हा विजय आहे असे प्रतिपादन संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष संदीप जगताप यांनी केले. जेजुरीतील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रविवारी (दि.२६) दिल्ली येथील जंतर मंतर मैदानात सुरू असलेल्या आंदोलनातील अमानुष लाठीहल्ल्याच्या विरोधात निषेध सभेचे आयोजन व केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचे स्वागत करताना आनंदोत्सव कार्यक्रमाचे करण्यात आले होते. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष उमेश जगताप, महिला आघाडीच्या आरती नरोटे, शहराध्यक्ष गणेश कुंभार, पिंटू जगताप, बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक सुनील धिवार, शहराध्यक्ष यशवंत दोडके, तसेच संभाजी ब्रिगेड, जिसा संघटनेचे अध्यक्ष विकास पवार यावेळी उपस्थित होते. देवसंस्थानचे माजी प्रमुख विश्वस्त शिवराज झगडे, शिव शाहू फुले आंबेडकर चळवळीतील जेष्ठ नेते पंढरीनाथ जाधव , बदाम माकर यांची यावेळी भाषणे झाली.

केंद्र सरकारने आंदोलनातील विद्यार्थ्यांवर दाखल केलेले गुन्हे तत्काळ मागे घ्यावेत, पेपर फुटीनंतर नैराश्यातून आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना एक कोटी रुपयांचे अर्थसहाय द्यावे. जखमी विद्यार्थ्यांवर सरकारच्या वतीने वैद्यकीय उपचार करावेत. अमानुषपणे लाठीचार्ज करणाऱ्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी आदी मागण्यांचे निवेदन यावेळी पोलीस प्रशासनाकडे देण्यात आले.